# धामणगाव नगर परिषद विभागात तिसरी

## स्वच्छ भारत सर्वेक्षण 2024 मध्ये घवघवीत कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.18 )**– स्वच्छ भारत मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण 2024 मध्ये दत्तापूर धामणगाव नगर परिषदेने उल्लेखनीय यश मिळवले असून या शहराने विभागात तिसरा क्रमांक आणि महाराष्ट्रात 165 शहरांमध्ये 37वा क्रमांक मिळवून संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट घडवली आहे.

याचबरोबर देशपातळीवर 1585 शहरांमध्ये 42वा क्रमांक मिळवून धामणगावने राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडली आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 21,059 लोकसंख्या असलेल्या या शहराने गेल्या काही वर्षांत स्वच्छतेच्या दिशेने भरीव पावले टाकली आहेत.

सरकारी पोर्टलवर उपलब्ध माहितीप्रमाणे, दत्तापूर धामणगावला 1-स्टार जीएफसी (कचरामुक्त शहर) रेटिंग व सीडीएफ डबल प्लस



सर्टिफिकेशन मिळाले आहे. घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता मोहीम आणि जनसहभागाच्या बाबतीत शहराने दिलेली कामगिरी अत्यंत उल्लेखनीय आहे. या यशाचे श्रेय नगर परिषदेतील सर्व कर्मचारी, सफाई कामगार, अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले जात आहे. विशेषत: अमोल माळकर तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या नियोजनबद्ध कार्यामुळे हे यश शक्य झाले, असे सांगण्यात येत आहे. या यशाबद्दल धामणगाव रेल्वे नगर परिषदच्या मुख्याधिकारी पुनम कळंबे यांनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, 'स्वच्छतेच्या दिशेने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित आहे. हे केवळ नगर परिषदेसाठी नव्हे तर संपूर्ण शहरासाठी गौरवाचे क्षण आहेत. स्वच्छतेसाठी योगदान दिलेल्या नागरिकांचे, कर्मचाऱ्यांचे व टीमचे मी मन:पूर्वक आभार मानते. आगामी काळात या यशाला अधिक बळकट करत धामणगावला स्वच्छतेच्या बाबतीत आदर्श बनवू.' या यशानंतर धामणगाव रेल्वेचे आमदार प्रताप अडसड यांनीही नगर परिषदेचे, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे विशेष कौतुक केले. त्यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, 'धामणगाव शहराने स्वच्छ भारत सर्वेक्षणात मिळवलेला मान हा आमच्या सर्वांच्या एकजुटीचा आणि सकारात्मक दृष्टिकोनाचा परिणाम आहे. हा केवळ आकड्यांचा विजय नसून आपल्या शहराच्या प्रतिमेचा आणि लोकांच्या सहभागाचा सन्मान आहे. आगामी काळातही शासनस्तरावरून आवश्यक सहकार्य आणि निधी मिळवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहीन.' या उल्लेखनीय कामगिरीमुळे दत्तापूर धामणगावचे नाव स्वच्छ भारत अभियानात अग्रगण्य शहरांमध्ये समाविष्ट झाले असून भविष्यातील उपक्रमांसाठी या यशामुळे नवा आत्मविश्वास प्राप्त झाला आहे.

# पदोन्नती झालेल्या शिक्षकांना वेतनवाढ द्यावी!

### शिक्षक समितीची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )** – पदोन्नती मिळालेल्या शिक्षक बंधू-भगिनींना त्यांच्या वाढलेल्या जबाबदाऱ्यांच्या अनुषंगाने मनासे (वेतन) नियम 1981 आणि 1985 च्या तरतुदींनुसार वेतनवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा शाखा अमरावती ने निवेदनाद्वारे केली आहे.

हे निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांना आज दिनांक 18 जुलै रोजी देण्यात आले.

अजयानंद पवार (जिल्हाध्यक्ष), शैलेंद्र स. दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस) व अनिल जगनाडे हे निवेदन देतेवेळी उपस्थित होते.




### अश्या आहेत मागण्या

शिक्षकांची जेव्हा पदोन्नती होते आणि त्यांच्या कार्यकर्तव्यात आणि जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होते, तेव्हा एक वेतनवाढ देऊन वेतन निश्चिती करणे, ज्या शिक्षकांना चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी मिळालेली आहे, त्यांची वेतननिश्चिती मनासे नियम 1981 च्या नियम 11(2) नुसार होते, पण जेव्हा अपदवीधर / पदवीधर प्राथमिक शिक्षकांना मुख्याध्यापकपदी पदोन्नती दिली जाते, त्यावेळी जबाबदाऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ होत असल्याने वेतननिश्चिती मनासे नियम 1981 च्या नियम 11(1) नुसार केली जावी, जिल्हा परिषद अमरावतीने निर्गमित केलेल्या आदेशातील अट क्रमांक 3 व 4 ही केवळ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू आहे, शिक्षकांना नव्हे. त्यामुळे या अटी रद्द कराव्यात, शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविल्याप्रमाणे, पदोन्नती झालेल्या सर्व शिक्षकांना वेतनवाढीचा लाभ द्यावा, जेणेकरून त्यांच्या नव्या जबाबदाऱ्यांचे योग्य मूल्यांकन होईल व त्यांचे मनोबल वाढेल.

# माया केदार नव्या समाज कल्याण विभाग प्रादेशिक उपायुक्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** – प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग अमरावती येथे अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या श्रीमती माया केदार हयांची मूळ आस्थापना उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बुलडाणा ही जबाबदारी सांभाळत त्यांनी सक्षमपणे अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा व वाशीम या जिल्ह्यांची जबाबदारी सांभाळली व शासन आदेश दिनांक 11 जुलै 2025 अन्वये त्यांची प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती या पदावर विनंतीने बदली झाली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे समाज कल्याण विभाग अमरावती येथे प्रथम महिला प्रादेशिक उपायुक्त होण्याचा मान त्यांना मिळाला आहे.



# महावितरण ; त्या सहाय्यक अभियंत्याचे निलंबन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )**- महावितरणच्या वरूड-2 उपविभागाचे सहाय्यक अभियंता यांनी नेट मीटर बसविण्यासाठी रिलीज ऑर्डर काढण्याच्या मोबदल्यात लाच मागितल्याचे उघड झाले असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकून त्यांनी लाच स्वीकारल्यामुळे त्यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गंभीर प्रकारामुळे महावितरणने त्यांना तत्काळ सेवेतून निलंबित केले आहे. सदर कारवाई मुख्य अभियंता यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे. महावितरणकडून ग्राहकाभिमुख आणि पारदर्शक सेवा देण्याचा प्रयत्न सतत केला जातो. मात्र, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांच्या अहवालानुसार, सहाय्यक अभियंत्यांनी दिलीप शंकरराव खेरडे (सोलर व्यावसायिक, कृष्णा सोल एनर्जी) यांच्याकडून विक्रांत झामडे व सुनिता झामडे यांच्या घरी प्रत्येकी दोन किलोवॅटच्या रूफटॉप सोलर प्रकल्पासाठी नेट मीटर बसविण्यासाठी लाच मागितली होती. यावेळी, 5 जुलै रोजी वरूड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली. महावितरणच्या सेवेतील अधिकारी वा कर्मचारी भ्रष्टाचारात अडकणे ही बाब गंभीर आहे. हे कृत्य महावितरण सेवाविनियम 2005 च्या तरतुदींच्या स्पष्ट विरोधात आहे. त्यामुळे, संबंधित सहाय्यक अभियंत्याची सेवा महावितरणच्या प्रतिष्ठेसाठी धोकादायक ठरू शकते, असे मानून त्यांच्यावर ही निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या खात्यातील रक्कम बँकेच्या परस्पर कपातीला आळा घालावा

### प्रहार संघटनेची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि.18 )** – तालुक्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या रकमेवर बँका कर्जफेडीसाठी परस्पर कपात करत असल्याच्या विरोधात प्रहार जनशक्ती पक्षाने तीव्र नाराजी व्यक्त केली असून तहसीलदार रामदास शेळके यांना निवेदन सादर करण्यात आले.

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, गारपीट, अतिवृष्टी यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. या परिस्थितीत त्यांना नुकसानभरपाई, श्रावणबाळ योजना, तसेच अन्य सानुग्रह निधी शासकीय योजनांद्वारे दिला जातो. परंतु, ही रक्कम शेतकऱ्यांच्या हाती येण्याआधीच काही बँका त्यातून कर्जफेडीसाठी कपात करतात, तर काही बँका खाते होल्ड करून ठेवतात. त्यामुळे शेतकऱ्यांना बँक व्यवहार करता येत नाहीत आणि ते आर्थिक अडचणीत सापडतात.

प्रहार संघटनेच्या म्हणण्यानुसार, बँकांची ही कृती नियमबाह्य असून ती शेतकऱ्यांच्या हक्काच्या रकमेवर अन्यायकारक हस्तक्षेप आहे. यामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली जात आहेत व काही वेळा आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेण्याची वेळ येते. या पार्श्वभूमीवर प्रहारने तालुक्यातील सर्व बँक व्यवस्थापकांसोबत समन्वय बैठक घेऊन ही समस्या तातडीने सोडवावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आंदोलने छेडण्यात येतील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनप्रसंगी जिल्हा प्रमुख चंदू खेडकर, तालुका प्रमुख प्रणव कडू, तालुका संपर्कप्रमुख अजय चौधरी, अँड. पवन वाढीवे, ज्ञानेश्वर यावले, लीलाधर काकडे, विलास पंडागळे, अजय बोहरूपी, प्रदीप हरले, मुकेश डबरासे, सैजद शाह, अप्रोज शेख, हरीश कांबळे यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक अधिकारी पॅनेल जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )**–ई वर्गातील म्हणजेच 250 पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सदस्य असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी पॅनेल तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती कार्यालयाकडून देण्यात आली.

यासंदर्भात पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात आले असून, शासकीय विभाग किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत वरिष्ठ लिपिक किंवा त्याहून वरिष्ठ कर्मचारी, प्रमाणित लेखापरीक्षक, वकील, तसेच शासकीय/निमशासकीय संस्थांमधून निवृत्त झालेले अधिकारी (वय 65 वर्षांपेक्षा कमी) यांना अर्ज करता येणार आहे. विहित नमुन्यातील अर्ज 21 जुलै 2025 ते 21 ऑगस्ट 2025 या कालावधीत सहकार संकुल, कांता नगर, अमरावती येथील विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक यांच्या कार्यालयात शासकीय सुट्ट्या वगळून, कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. अर्जाचा नमुना जाहीर नोटीस बोर्डवरही प्रसिद्ध करण्यात आला आहे.जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी इच्छुक अर्जदारांना 21 ऑगस्ट 2025 पर्यंत आपले अर्ज कार्यालयीन वेळेत सादर करण्याचे आवाहन केले आहे.

### जिल्हा महिला लोकशाही दिन येत्या सोमवारी

**अमरावती** – जिल्हा महिला लोकशाही दिन सोमवार, दिनांक 21 जुलै 2025 रोजी सकाळी 11 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. तरी संबंधितांनी अहवालासह व्यक्तिश: उपस्थित राहण्याचे आवाहन अधीक्षक निलेश खटके यांनी केले आहे.

### निर्मलाबाई गावंडे यांचे निधन

**अमरावती** – श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद माजी प्राचार्य डॉ.एकनाथराव गावंडे यांच्या पत्नी निर्मलाबाई गावंडे यांचे आज18 जुलै रोजी सकाळी तीन वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय



74 वर्षे इतके होते. हिंदू स्मशानभूमी मध्ये सौ.निर्मलाबाई वानखडे यांच्यावर आज अंतिम संस्कार पार पडले. यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यांच्या पश्चात मुलगा प्रा. डॉ. अमित, सुमित, मुलगी डॉ.वर्षा गावंडे, सूना, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# पांढरघाटी-खडका-जामगावसाठी स्वतंत्र बस सेवा सुरू

### विद्यार्थ्यांच्या संघर्षाला यश

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.18 )**– पांढरघाटी, खडका आणि जामगाव या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून स्वतंत्र एस.टी. बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेमुळे आता विद्यार्थ्यांना वेळेवर, सुरक्षित आणि सुलभ शिक्षण प्रवास शक्य होणार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून या परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दररोजच्या प्रवासात गर्दी, बसगाड्यांची अनुपलब्धता आणि वेळेचा अपव्यय यांचा सामना करावा लागत होता. यामुळे शैक्षणिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होत होता. विद्यार्थ्यांच्या या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी



'अखिल माकोडे मित्र परिवार' आणि विद्यार्थ्यांनी मिळून वरुड आगार व्यवस्थापकांकडे निवेदन सादर केले होते. निवेदनात पांढरघाटी गावासाठी सकाळी 9 व सायंकाळी 5 वाजता बस सेवा सुरू करावी. जामगावसाठीही याच वेळेस स्वतंत्र बस उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत वरुड आगार व्यवस्थापनाने तातडीने बस सेवा मंजूर केली आहे. या निर्णयामुळे पांढरघाटी, खडका आणि जामगाव परिसरातील विद्यार्थ्यांना वेळेवर शाळा-महाविद्यालय गाठता येणार असून, त्यांचा प्रवासही अधिक सुरक्षित व आरामदायी होणार आहे. या निर्णयाबद्दल विद्यार्थ्यांनी, पालकांनी व ग्रामस्थांनी महामंडळाच्या वरुड आगार व्यवस्थापकांचे तसेच अखिल माकोडे मित्र परिवाराचे विशेष आभार मानले आहेत. हा निर्णय ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, असे मत अखिल मकोड़े , संकेत मगरदे, स्वप्निल गावंडे, हर्षल मधापुरे, माधुरी जुमडेकर, भूमिका कापसे, तनुजा काकपुर, शिवम नींबुरकर, हर्षल गावंडे, प्रतीक गायकी, विशेष वानखेडे, देवेश वानखडे, आदित्य सोनारे यांनी व्यक्त केले होते.

# बँकांनी उद्योगाला कर्ज सुविधा देऊन अर्थव्यवस्थेला गती द्यावी

### जिल्हाधिकारी आशिष येरेकर | एक जिल्हा एक उत्पादन मान्यवरांना भेट देणार





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )** – केंद्र आणि राज्य शासनाने छोट्या उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आखल्या आहेत. सवलतीच्या दरात त्यांना कर्ज पुरवठा करून ग्रामीण भागातही उद्योग उभारणीला चालना देण्यात येत आहे. त्यामुळे बँकांनीही उद्योगांना कर्ज सुविधा देऊन अर्थव्यवस्थेला गती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने शासकीय विभाग आणि बँकांच्या अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी परिविक्षाधीन अधिकारी कौशल्या एन., अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम, खादी ग्रामोद्योगचे व्यवस्थापक प्रदीप चेचेरे, कौशल्य विकासच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, कृषी विभागाचे उपसंचालक वरूण देशमुख, पर्यटन विभागाचे विजय अवताडे, मावीमचे रंजन वानखेडे यांच्यासह विविध बँकांचे प्रादेशिक अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, देशाने पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष ठेवले आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्रात बँकांना गुंतवणूक करावी लागणार आहे. यात बँकांचा सहभाग महत्त्वाचा राहणार आहे. बँकांनाही ही संधी समजून खाजगी क्षेत्रात सकारात्मक दृष्टिकोनातून काम करावे लागणार आहे. खाजगी क्षेत्रात गुंतवणूक करून नव्या नोकऱ्या निर्माण करणे गरजेचे आहे. उद्योजकांना सुलभता व्हावी, यासाठी प्रत्येक बँकेत बिझनेस फॅसिलेशन सेंटर असणे गरजेचे आहे. या कक्षाच्या माध्यमातून गुंतवणूक प्रशिक्षण आदींबाबत माहिती देण्यात यावी. यासोबतच उद्योजकांकडून शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून दाखल करण्यात येणाऱ्या प्रस्तावात त्रुटी राहू नये, यासाठीही प्रयत्न करावे. बँकांनीही प्रभाव पडू शकतील, अशी क्षेत्रे निवडून त्या उद्योगांचे कर्ज प्रस्ताव मंजूर करावेत. यावेळी खादी ग्रामोद्योग, कृषी, पर्यटन, आर-सेटी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटके महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या उद्योग कर्जविषयक योजनांचा आढावा घेण्यात आला. एक जिल्हा एक उत्पादन ही आता जिल्ह्याची ओळख झाली आहे. सर्व शासकीय कार्यक्रमात मान्यवरांच्या स्वागताला आता या भेटवस्तू देण्यात येतील. यासाठी सर्व विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. यावेळी शासकीय योजनांचे कर्ज प्रकरण मंजूर करण्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अग्रणी बँक व्यवस्थापक हेडाऊ यांनी प्रत्येक बँकेत बिझनेस फॅसिलेशन सेंटर उभारावे, तसेच विविध योजनांमध्ये माध्यमातून देण्यात येणारी कर्ज प्रकरणे निकाली काढावीत असे आवाहन केले. निकम यांनी प्रास्ताविक केले. कादरी यांनी आभार मानले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत सानिया परवीन उर्दू माध्यमातून तालुक्यात प्रथम

### जि. प. उर्दू शाळा, मांजरखेड च्या इतिहासात शिष्यवृत्ती मिळविणारी पहिली विद्यार्थीनी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.18 )** – जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळा मांजरखेड (कसबा) येथील विद्यार्थिनी सानिया परवीन शेख इर्शाद हिने शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उर्दू माध्यमातून चांदूर रेल्वे तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

पाचवी व आठवीसाठी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.



यात सानिया परवीन (वर्ग आठवी) हिने ग्रामीण खुल्या गटात सर्वाधिक गुण मिळवून तालुक्यातील उर्दू माध्यमातून प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला. हे यश प्राप्त करणारी ती मांजरखेडच्या उर्दू शाळेच्या इतिहासातील पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे गावात आणि शाळेत आनंदाचे वातावरण आहे. तिच्या या यशाबद्दल तिचा शाळेत सत्कार करण्यात आला. सानियाने आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापक मिर्झा गफ्फार बेग, शिक्षक इर्शाद, परवेज , महिला शिक्षक इमराना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष काझी हाफिज तसेच आपल्या आई-वडिलांना दिले.

# आष्टीच्या त्या युवकाची हत्याच

## दोन आरोपींना हैदराबादमधून अटक



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.18 )** – वघाळ ते वाडेगाव महामार्गालगत घडलेल्या खळबळजनक खून प्रकरणाचा छडा लावत अमरावती एलसीबी पथकाने अवघ्या काही दिवसांत दोन आरोपींना हैदराबाद येथून अटक केली आहे. मृतक राहुल अशोक तायडे (वय 39, रा. किन्ही, ह.मु. नवीन आष्टी) याचा खून त्याचेच दोन मित्र गौरव गोपाल परतेती (वय 20) आणि गोपाल महादेव कुमरे (वय 23, दोघेही रा. झटामझीरी) यांनी मिळून केल्याचे उघड झाले आहे.

सहा दिवसांपूर्वी राहुल तायडे हा आपल्या दोन मित्रांसोबत दुचाकीवर बाहेर गेला होता. मात्र रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला. अखेर सहा दिवसांनी वघाळ–वाडेगाव महामार्गालगत झुडपांमध्ये त्याचा मृतदेह आढळून आला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अवस्थेतील मृतदेह पाहून परिसरात खळबळ उडाली. घटनेच्या गंभीरतेची दखल घेत पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि स्थानिक माहितीच्या आधारे तपास पुढे नेण्यात आला. यामध्ये आरोपी गौरव परतेती व गोपाल कुमरे हे गावातून पसार झाल्याचे लक्षात आले. तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेऊन पोलिसांनी हैदराबादमध्ये दोघांना अटक केली.


### दारूच्या नशेतून वाद आणि खून

प्राथमिक चौकशीत असे स्पष्ट झाले की, राहुल व त्याचे मित्र दारू पिऊन फिरायला गेले होते. त्याच दरम्यान त्यांच्यात काही कारणावरून वाद झाला आणि वादाचे पर्यवसान खुनात झाले. याच वादातून आरोपींनी मिळून राहुलचा निर्घृणपणे खून केल्याचा अंदाज आहे. दोन्ही आरोपींना वरुड न्यायालयात हजर केले असता त्यांना 7 दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय संदीप लेकुरवाळे, विवेक घोरमाडे व चंदू वानखडे करीत आहेत.

# मॅनेज टेंडरिंग : मुख्यमंत्री कार्यालयाकडून ग्रामविकास मंत्रालयाला मेल

**दर्यापूर पंचायत समितीअंतर्गत भ्रष्टाचार कारवाई करण्याचे आदेश | लवकरच चौकशी समिती होणार गठीत**




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )** – दर्यापूर पंचायत समिती अंतर्गत ग्रामविकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने ग्रामविकास मंत्रालयाला कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले असून, लवकरच चौकशी समिती स्थापन होण्याची शक्यता आहे.

ग्रामपंचायतींमध्ये विकास कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप होत आहे. विशेषत: पनोरा ग्रामपंचायतसह अनेक गावांमध्ये 'मॅनेज' केलेली टेंडर प्रक्रिया, निकृष्ट दर्जाचे साहित्य व कागदोपत्री दाखवलेली कामे यामुळे शासनाची फसवणूक झाल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले आहेत.

सचिवांकडून टेंडर पूर्वनियोजित ठराविक ठेकेदारांना देऊन खुल्या स्पर्धेला बगल दिली जात असल्याचा आरोप आहे. यामध्ये जाहिरात प्रकाशित न करता निविदा काढणे, अपूर्ण माहिती देणे व खाजगी संगनमतातूनच टेंडर मंजूर करणे, हे प्रकार सर्रास सुरू असल्याचे उघड झाले आहे. पनोरा ग्रामपंचायतीत तर काही कामांचा दर्जा तपासण्याआधीच पूर्ण रक्कम देण्यात आल्याचे समोर आले आहे.

### दै. महासागर च्या वृत्ताची दखल

दैनिक महासागर ने याप्रकरणी वृत्त मालिका प्रकाशित करुन दर्यापूर पंचायत समितीअंतर्गत होत असलेला भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला आहे. या वृत्तमालिकेची दखल घेत मुख्यमंत्री कार्यालयाने याप्रकरणी संबधित विभागाला कारवाई आदेश दिले असल्याची माहिती ई मेल व्दारे 'दै. महासागर' कळविण्यात आली आहे. या सगळ्या प्रकरणामुळे पारदर्शक स्पर्धकांवर अन्याय होत असून, ग्रामविकासाच्या नावाखाली गावकऱ्यांच्या विश्वासाला तडा जात आहे. ग्रामपंचायत स्तरावर अशा प्रकारे विकासकामांचे 'व्यवस्थापन' होत असेल, तर लोकशाही व्यवस्थेची लक्तरं वेशीला टांगली जात असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे.

# हिवरखेडमध्ये आठवडी बाजारामुळे वाहतुकीला अडथळा



**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड ( दि.18 )**– येथे दर सोमवारी भरणाऱ्या आठवडी बाजारामुळे गावात वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

बाजारतळ डांबरीकरण रस्त्यालगतच असल्यामुळे विक्रेते दोन्ही बाजूंनी आपापली दुकाने लावतात, ज्यामुळे वाहनचालकांना रस्ता ओलांडताना अडचणींना सामोरे जावे लागते. काही वेळा वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याचीही वेळ येते.

विशेषत: सकाळी व संध्याकाळी शालेय वाहतूक, रुग्णवाहिका वा अत्यावश्यक सेवांची वाहने या गर्दीमुळे अडकल्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. हिवरखेड वासीयांनी बाजारासाठी वेगळ्या जागेची व्यवस्था करण्यात यावी, जेणेकरून रस्ता मोकळा राहील आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, अशी मागणी वरीष्ठ प्रशासनाकडे केली आहे. बाजार व्यवस्था सुधारण्यासाठी तात्काळ पावले उचलावीत, अन्यथा आंदोलनाचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

# सोन्याच्या गिन्न्याचे आमिष देत फसवणूक करणारे अखेर जेरबंद



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 )** सोन्याच्या गिन्न्या असल्याचे आमिष दाखवून तब्बल तीन लाख रुपयांची जबरी फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारांपैकी फरार असलेले दोन आरोपींना जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश मिळाले. या कारवाईमुळे तब्बल महिनाभरापासून फरार असलेले आरोपी अखेर पोलिसांच्या तावडीत आले असून, पुढील तपासासाठी त्यांना नांदगाव खंडेश्वर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

17 जून 2025 रोजी पद्मिनी भरणे (वय 45, रा. सारखनी, ता. किनवट, जि. नांदेड) यांना दीपक पल्हाडे (रा. गोंडवडसा, ता. किनवट) याने कमी पैशात सोन्याच्या गिन्न्या मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्याचबरोबर साथीदारांसह बनावट सोन्याच्या गिन्न्या दाखवून फिर्यादीस मारहाण केली व तिच्याकडून 3 लाख रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. त्यानंतर आरोपी चारचाकी वाहनातून घटनास्थळावरून फरार झाले. या प्रकरणी नांदगाव खंडेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी प्राथमिक तपासादरम्यान दीपक उर्फ अश्विन पल्हाडे, शामराव राखडे व सचिन तोडसाम यांना अटक करण्यात आली होती. मात्र या टोळीतील प्रमुख आरोपी लक्ष्मण देवीदास जाधव (रा. कारंजा, जि. वाशिम) आणि त्याचा सहकारी कैलास भाउराव जाधव (रा. सावंगी, ता. दारव्हा, जि. यवतमाळ) हे दोघे फरार होते.

दोनही आरोपींचा शोध सुरू असतानाच 17 जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली की लक्ष्मण जाधव आपल्या राहत्या घरी हजर आहे. तत्काळ पथकाने त्याच्या घरी छापा टाकून त्याला अटक केली. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि त्याचा साथीदार कैलास जाधव यालाही पथकाने अटक केली.

**पोलीस अधिकाऱ्यांचे कौतुकास्पद मार्गदर्शन**

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि मुलचंद भांबुरकर यांच्या नेतृत्वात पार पडली. त्यांच्या पथकातील अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया आणि प्रज्वल राऊत या कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय भूमिका बजावली.

### फसवणूक टोळीचे जाळे उघडकीस

या कारवाईतून बनावट सोन्याच्या गिळ्यांच्या आमिषावर आधारित फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, इतर आरोपींच्या शोधासाठी तपास सुरू आहे. नागरिकांनी अशा प्रलोभनांना बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# घटनास्थळ पंचनामा करताना आरोपीची डोंगरात कूच!

**परतवाडा पोलिसांच्या ताब्यातील आरोपी फरार**



**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.18 )** – अचलपूर तालुक्यातील म्हसोना गावातील एक खळबळजनक घटना समोर आली असून, पोलिसांच्या कस्टडीतील आरोपी घटनास्थळ पंचनाम्यादरम्यान फरार झाला आहे. नामदेव बळीराम दहीकर (वय 35) असे या फरार आरोपीचे नाव असून, त्याने आपल्या भावावर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल होता. घटनेचा तपशील असा की, पोलीस पाटील देवेंद्र खंडेझोड यांच्या शेतात रखवालदारी करणारे बळीराम दहीकर सणानिमित्त गावात आले होते. दरम्यान, नामदेवने आपला भाऊ विलास बळीराम दहीकर याच्याकडे पैशांची मागणी केली. मात्र विलासने नकार दिल्यानंतर नामदेवने लोखंडी पाईपने डोक्यावर मारून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी तक्रारीवरून नामदेव दहीकरला अटक केली होती. पोलिस तपासादरम्यान आरोपीला घटनास्थळी तपासासाठी नेले असता, त्याने डोंगराळ भागात पोलिसांना चकमा देत पळ काढला.या धक्कादायक घटनेने पोलिस यंत्रणेची कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्येही चिंता वाढली आहे. पोलिसांनी घटनास्थळी सर्च ऑपरेशन सुरू केले असून, आरोपीचा शोध सुरू आहे. पोलिस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर शोधमोहीम राबवली जात आहे. घटनेनंतर पोलीस अधीक्षकांनी स्वत ः परतवाडा पोलीस स्टेशनला भेट देत पुढील कारवाईचे निर्देष दिले.

# दिव्यांगांचे मानधन 1500 हून 2500 रुपयांवर

- बच्चू कडूंच्या अन्नत्याग आंदोलनाला अखेर यश!
- केंद्राकडून मानधन वाढीसाठी लढा सुरूच



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, ( दि.18 )** – मोझरीच्या पवित्र मातीवर सुरू झालेलं मा. बच्चूभाऊ कडू यांचं अन्नत्याग आंदोलन अखेर यशस्वी ठरलं आहे. सात दिवसांचा अन्नत्याग, हजारो किमीची पायी यात्रा, आणि त्यामागे असलेली दिव्यांगांच्या हक्कांसाठीची आग्रही भूमिका या सर्वांचे फलित म्हणजे राज्य सरकारकडून दिव्यांग मानधन 1500 रुपयांवरून 2500 रुपये करण्याचा निर्णय. मात्र हा निर्णय म्हणजे केवळ आर्थिक मदत नाही, तर दिव्यांगांच्या स्वाभिमानाचा विजय आहे. त्यांच्या संघर्षाला आणि आशांना अखेर शासन दरबारी मान्यता मिळाली आहे. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडूंनी केलेल्या आंदोलनामूळे हजारो कुटुंबांना हा दिलासा मिळाला असल्याचे सांगितले जात आहे.

कारण हा निर्णय अर्धवट आहे. दिव्यांगांचे खरे जीवनमान सुधारायचे असेल, तर किमान 6000 मानधन आवश्यक आहे, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

> लढा थांबलेला नाही, फक्त एका टप्प्यावर यश मिळालंय. केंद्राकडून मानधन वाढीसाठी लढा देणार!
>
> **प्रहार संघटना**

औषधे, प्रवास, शिक्षण, राहणीमान, दैनंदिन गरजा या सर्व बाबींचा विचार केल्यास सध्याचे 2500 रुपये अपुरेच आहेत. आज सरकारचे आभार मानले जात आहेत, परंतु उद्या याच सरकारने या प्रश्नाकडे डोळेझाक केली, तर पुन्हा नव्याने संघर्ष उभारावा लागेल, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

# अमरावतीत दोन निवृत्त पोलिस अधिकारी अटकेत

## विदेशी दारूचा लष्करी कॅन्टीन कनेक्शन!



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 )** – लष्करी कॅन्टीनवर मिळणाऱ्या परदेशी दारूचा गैरवापर करत ती बेकायदेशीर मार्गाने वाहतूक करणाऱ्या दोन निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांना अमरावतीत रंगेहात पकडण्यात आले. ही धडक कारवाई उत्पादन शुल्क विभागाने नागपूर–अमरावती रोडवरील वेलकम पॉईंट येथे केली.

अटक करण्यात आलेले आरोपी शांताराम हरी थाटे (वय 45, गीता नगर, अकोला) आणि रामेश्वर जानुजी पुंडकर (वय 54, संभाजी नगर, अकोला) हे दोघेही भारतीय लष्करातून निवृत्त झालेले पोलिस कर्मचारी आहेत. त्यांनी कॅन्टीनवरील सवलतीचा गैरवापर करत ब्रँडेड विदेशी दारू बेकायदेशीररीत्या वाहनाद्वारे वाहून नेत असल्याचे आढळले.

**1.77 लाखांचा मुद्देमाल जप्त**

एमएच–30/एझेड–6039 या क्रमांकाच्या सुझुकी ब्रेझा गाडीमध्ये पर्यटकांच्या बॅगांमध्ये दारू लपवण्यात आली होती. तपासादरम्यान गाडी, बॅगा आणि दारूसह एकूण 1 लाख 77 हजार 400 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या बाटल्यांमध्ये ब्लॅक डॉग, व्हॅट 69, ब्लॅक अँड व्हाईट यांसारख्या ब्रँडेड विदेशी दारूंचा समावेश होता.

**रॅकेटचा संशय**

ही कारवाई गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली. या कारवाईत वायाळ, सुभाष खरे, आकाश जाधव, सादिक औरंगाबादे, अंकुश काळे, आर.पी. मोकळकर, पी.आर. भोरे, सुजित जाधव, जगदीश चव्हाण आदी अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

लष्करी कॅन्टीनच्या सवलतीचा गैरवापर करून काही निवृत्त कर्मचारी व्यावसायिक पातळीवर दारू पुरवठा करीत असल्याचा संशय या कारवाईमुळे बळावला आहे. यामागे आणखी कोणी व्यक्ती किंवा मोठे रॅकेट कार्यरत आहे का, याचा तपास सध्या सुरू आहे.

**लवकरच मोठी कारवाई ?**

संबंधित प्रकरणात उत्पादन शुल्क विभाग अधिक सखोल चौकशी करीत असून, भविष्यात अशा नियमबाह्य विक्रीवर मोठी कारवाई केली जाणार असल्याची माहिती खात्रीशीर सूत्रांकडून मिळाली आहे.

### विदेशी दारूचा गोरखधंदा उघड

- 1.77 लाखांचा परदेशी दारू साठा जप्त
- 2 निवृत्त पोलिस अधिकारी अटकेत
- ब्लॅक डॉग, व्हॅट 69, ब्लॅक अँड व्हाईट यांसारख्या ब्रँड्सचा समावेश!



# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा

## प्रथम पारितोषिक 5 लाख रुपये



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )**– महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा 2025' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा नोंदणीकृत किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी खुली असून, अर्ज 20 जुलै ते 20 ऑगस्ट 2025 या कालावधीत ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज बाद करण्यात येतील, अशी माहिती संचालिका मिनल जोगळेकर यांनी दिली. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मंडळांना अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. असेही सांगण्यात आले आहे.

### विविध निकषांवर मंडळांचे परीक्षण

सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन, संस्कृती, गडकिल्ले, स्मारके व धार्मिक स्थळांचे जतन व जनजागृती, सामाजिक उपक्रम, पर्यावरणपूरक मूर्ती व सजावट, ध्वनिप्रदूषण मुक्त वातावरण, भक्तांसाठी सुविधा या निकषांवर मंडळाचे परिक्षण होणार आहे. 27 ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात, जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठित केलेल्या समित्या उत्सव स्थळांना भेट देऊन जिल्हास्तरीय परीक्षण करतील. त्यानंतर मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे व पुणे या जिल्ह्यांतून प्रत्येकी 3, तर उर्वरित 32 जिल्ह्यांतून प्रत्येकी 1, अशा एकूण 44 शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी पाठवण्यात येतील.

### पारितोषिकांचे तपशील

**प्रथम क्रमांक** – 5 लाख रुपये
**द्वितीय क्रमांक** – 2.5 लाख रुपये
**तृतीय क्रमांक** – 1 लाख रुपये
**जिल्हास्तरीय विजेते** – 25 हजार व प्रमाणपत्र

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासात पहिल्यांदाच सभागृहात व सभागृहाबाहेरील वातावरण पाहिल्यावर हे नक्कीच लोकशाहीचे मंदिर आहेत का ? हा प्रश्न लोकांना पडावा. काल शेवटच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज आटोपले. पण प्रत्येक आमदार आपापल्या मतदारसंघात जाण्यापूर्वी हजार वेळा विचार करीत असेल की इथून पुढे काही खरं नाही. विधिमंडळाच्या आवारात माता-भगिनींचा होणारा उद्धार, अनेक प्राण्यांचा शिवीगाळीत होणारा उल्लेख व पोलिसांची हतबलता असे केविलवाणे चित्र उभ्या महाराष्ट्राने पाहिले. महाराष्ट्राच्या विधानसभेत काही आमदार बोलायला लागले की शिशारी यायला लागली. यात कोणाचा अवमान करण्याचा हेतू नाही परंतु त्यांनी बोलायला सुरुवात केल्यानंतर अक्षरशः घाणच बाहेर पडते टीव्ही समोर ऐकताना अनेक जण चॅनेल बंद करतात. मग टीव्हीतून बघायचं तरी काय ? हाही प्रश्न पडतो. राज्य पातळीवरील जी अवस्था आहे ती देशपातळीवर देखील दिसू लागली आहे. सामान्य माणसांच्या प्रश्नाला सभागृहात वाचा फुटलेली कधी ऐकायला मिळाली का? लक्षवेधी मांडायची आणि मागे घेऊन मांडवली करायची, याबाबतीत काही आमदारांचा महाराष्ट्रभर नावलौकिक झाला आहे. लक्षवेधीच्या माध्यमातून प्रश्न मांडल्याची बातमी संबंधिताला पोहोचते आणि तो सभागृहात हजर होऊन विषय संपवतो. सामान्य माणसाला यातले काहीही माहित नाही. त्याला दूरचित्रवाणीच्या पडद्यावर काय दिसले यावर तो व्यक्त होत असतो. भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे नेते तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यातील वादाने महाराष्ट्राने बिहारला दाखवून दिले की 'हम भी कुछ कम नही'. आव्हाडांनी दिलेल्या मंगळसूत्र चोर या घोषणेनंतर त्यांचा पडळकरांचा तिळपापड झाला होता. कारण आवडणे पडळकरांचा पूर्व इतिहास विधान भवनाच्या लॉबीत ओरडून ओरडून जाहीर केला. नंतर मात्र विधानभवनाच्या लॉबीमध्येच पडळकर आणि आव्हाड यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले अन् महाराष्ट्राचा बिहार झाल्याचे खात्री पटली. विधिमंडळातच आमदार सुरक्षित नाहीत. असं असेल तर आमदार कशाला राहायचं? असा संतप्त सवाल आव्हाडांनी केलाय. पण जनता पूर्णपणे असुरक्षित आहे त्याचे काय? विधिमंडळाच्या बाहेर अशा घटना आणि विधिमंडळाच्या प्रांगणात हे प्रकार घडणे यात फरक आहे. मुळातच गुंड प्रवृत्तीचे लोक विधानभवनात आलेच कसे? त्यांना पास कसा मिळाला? त्यांना पास देणारा आमदार कोण? याबाबत चौकशी झाली पाहिजे? कारण अनेकांना विधिमंडळात जाताना पास मिळणे अवघड जाते. पण मोक्कासह अनेक आरोप असलेले गुंड विधिमंडळात पुढाऱ्यांसारख्या पेहराव करून पुढाऱ्यांबरोबरच आत जातात. आता तर ते मारामाऱ्या करू लागले. मग महाराष्ट्राचा बिहार झाला नाही का?





# अखेर महाराष्ट्राचा 'बिहार' झाला!




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

यंदाचे विधानसभा अधिवेशन फक्त गोंधळ अन गोंधळाच्या माध्यमातूनच पार पडले. असंसदीय भाषा वापरून सभागृहांची गरीमा केव्हाच खाली गेली आहे.

आपण कोणाला निवडून दिले याचा पश्चाताप जनतेला होत असला, तरी जे निवडून गेले त्यांना त्यातून काहीही फरक पडत नाही. निवडून कसे यायचे याचे गुपित त्यांना माहीत झाल्यामुळे ते बिनधास्त आहे. त्यामुळे जनतेच्या वाट्याला आता असेच लोकप्रतिनिधी येतील की, जे सभागृहात शिवीगाळ करतील, सभागृहावर मारामाऱ्या करतील व आपल्या मतदारसंघाचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचतील. त्यांना ना नेते आवर घालतात, ना त्यांचा पक्ष आवर घालतो.

बिहारला नाव ठेवून चालणार नाही, तर आता महाराष्ट्राने बिहारपेक्षा अशा राजकारणात जास्त प्रगती केल्यासारखे दिसते. सहयोगी पक्षांना खूश करण्यासाठी राज्यात भयंकर तडजोडी केल्या जात आहेत. महाराष्ट्रात भाजप हा सर्वांत मोठा पक्ष आहे. त्यामानाने शिवसेनेतून फुटलेला शिंदे गट ही 'तात्पुरती' व्यवस्था आहे. कदाचित पुढील विधानसभा निवडणुकीनंतर वेगळेच चित्र दिसेल याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. अनेक बाबीतून शिंदे व भाजप यांच्यात सुरू झालेला सुप्त वाद संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला.

कॉंग्रेस पक्ष कमकुवत असला, तरी देशपातळीवर सर्वांत मोठा विरोधी पक्ष म्हणून त्यांनाच मान्यता मिळालेली आहे. बाकी प्रादेशिक पातळीवर अनेक पक्ष मजबूत असताना खिळखिळे झाले. राज्यातील सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. त्यामुळे पुन्हा सत्ता पाहिजे असेल, तर जातीयवाद केल्याशिवाय त्यांच्याकडेही पर्याय उरला नाही.

सध्या देशात आणि राज्यात राजकारण्यांचा जो नंगानाच सुरू आहे, ते पाहून जगातली सर्वांत मोठी लोकशाही धोक्यात आली आहे, हे कोणीही सांगू शकतो. खरेतर लोकशाहीच्या आडून देशात हुकूमशाहीच सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. स्वायत्त असलेल्या सर्व शासकीय यंत्रणा उदा. निवडणूक आयोग, रिझर्व्ह बँक, सीबीआय, ईडी वगैरे या संस्थांवर केंद्र सरकारकडून दबावतंत्राचा वापर करून विरोधी पक्षांना नामोहरम केले जात आहे.

विरोधकांनी कितीही ओरड केली तरी त्यात फरक पडणार नाही. कारण त्याच माध्यमातून सत्ताधारी संपूर्ण राज्यावर, देशावर अंकुश ठेवू लागले आहेत. सध्या फोडाफोडीमुळे कोण खासदार, आमदार कोणत्या पक्षाचा आहे, हेच जनतेला कळेनासे झाले आहे. एकाच पक्षाचे दोन तुकडे करून एक तुकडा आमच्याबरोबर असे न म्हणता, तो पक्षच आमच्याबरोबर आहे, असा दावा केला जातो. या सर्व प्रकरणात मतदारांच्या मतांचे मूल्य काय राहिले?

सध्या देशात आणि राज्यात अतिशय घाणेरडे राजकारण सुरू आहे. जनतेला भडकावून आपली राजकीय पोळी भाजून घेतली जात आहे. हिंदुराष्ट्राचे स्वप्न दाखविले जात आहे. केंद्रात आणि बहुतांश राज्यात हिंदूंचेच सरकार असताना, हिंदुराष्ट्र का घोषित केले जात नाही? हे मात्र कुणीच बोलत नाही.

एकनाथ शिंदेंनी सुरत, गुवाहाटी आणि गोवा येथे आमदारांना घेऊन प्रवास केला. पंचतारांकित हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था एकटे शिंदे करू शकतात का?

एकनाथ शिंदे आणि कंपनीने 'हिंदुत्व' आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस म्हणजेच अजितदादा पवार निधी देत नाहीत म्हणून बंड केले, असे सांगितले होते. पण दादांनी बंड करून शिंदेंच्याच मंत्रिमंडळात दाखल झाल्यामुळे शिंदे गटाची पूर्ण वाताहत झाल्याचे राज्य पहात आहे.

महाराष्ट्र विधानसभेत झालेल्या चर्चा पाहून हल्लीच्या खोटारड्या राजकारणाचे चित्र पाहून अनेकांचे मन उद्विग्न होते. सामान्यांच्या मनात राजकारणाविषयी दिवसेंदिवस चीड निर्माण होत आहे. त्यातच लोकांनी नाकारलेले पक्ष फाटाफुटीच्या माध्यमातून सत्ता स्थापन करतो, हेच वाईट आहे. महाराष्ट्रात पुढे काय होणार, याचा अंदाज लोकांना आजच आला आहे.

अजितदादा आणि मंडळींना जवळपास सगळ्या प्रकरणांत 'क्लीन चीट' मिळालेली असल्याने ते सर्वजण निवांत आहे. त्यांच्यावर असलेला 'ईडी'चा धाक संपलेला आहे, पण आपण काय केलं हे मोदी, शहा, फडणवीस यांना सर्वकाही माहीत आहे. कोणतीही नीतिमत्ता न ठेवता घाऊक पद्धतीने सरकार पाडण्याचा, माणसे फोडण्याचा सपाटा देशभर सुरू आहे.

लोकशाही जिवंत ठेवायचीच नाही, याचे धोरण आखले जात आहे. नुसती फोडाफोडी नाही, तर पक्षासहित होलसेल दुकान खरेदी करण्याचा प्रकार सुरू झाला आहे. निवडणूक आयोग दावणीला बांधून पक्षच्या पक्ष गिळंकृत करायचा, असे मनाला न पटणारे प्रयोग सुरू झाले आहेत. जनतेच्या मताला काहीच किंमत शिल्लक राहिली नसेल, तर महाराष्ट्रातील विधानसभा बरखास्तच केली पाहिजे.

(स्व.) यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांनी महाराष्ट्रातील राजकारणाला एक वेगळी दिशा दिली. राजकारणाचा सुयोग्य पाया रचला. महाराष्ट्राचे राजकारण म्हणजे सुसंस्कृत राजकारण, अशी परंपरा निर्माण केली. पण त्याला आता छेद गेला आहे. शरद पवार, छगन भुजबळ यांचे बंड हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग समजला गेला. राजकारणाचा स्तर तेव्हापासून ढासळतच गेला.

केंद्रातील भाजप सरकारने भ्रष्ट नेत्यांवर ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्सचे छापे टाकले अन त्याचा अर्थ राजकारणाशी जोडला जाऊ लागला. देश आणि राज्याला नेते, प्रशासकीय अधिकारी आणि उद्योगपतींनी लुटायला सुरूवात केली. नेते, अधिकारी आणि उद्योगपती यांच्याकडे ब्लॅक मनी आहे. त्यामुळे लुटारूंवर कारवाई व्हायला हवी होती, पण त्या कारवाया सर्व पक्षांतील लुटारूंवर व्हायच्याऐवजी केवळ भाजप प्रवेशासाठी विरोधकांवरच सुरू झाल्या.

विरोधी पक्षांतील भ्रष्ट नेते भाजपत आले की स्वच्छ होतात, ही वस्तुस्थिती आहे. यातून लोकांचे काय भले झाले? राजकारण आणि समाजकारण गढूळ होत गेले. विधानसभेतील सदस्य जनतेचा विचार करायला तयार नाहीत. शेतीमालाला भाव नाही. तो मातीमोलाने विकावा लागत आहे. शेतकरी कर्जबाजारी झाला आहे, अनेक शेतकरी आत्महत्या करत आहेत, तरुणांच्या हाताला काम नाही, बेरोजगारांची फौज तयार होत आहे, राज्यातील अनेक उद्योग गुजरातला जात आहेत, अशा प्रश्नांची चिंता कुणालाच का वाटत नाही?

निवडणुकीत खर्च केलेला पैसा वसूल करण्यासाठी सर्वांना सत्ता लागते. सत्तेत जायचे असेल तर कोणतीही तडजोड करायला आमदार, खासदार तयार होतात. त्यांना मतदारांचा धाकच उरला नाही, हे सत्य स्वीकारावेच लागणार आहे !अखेर महाराष्ट्राचा 'बिहार' झाला!

### देश भांडवलदारांच्या गुलामीतच राहणार?

लोकशाही आता शिल्लक आहे असं वाटत नाही. ज्या देशाचा उपराष्ट्रपती संविधानावर हात ठेऊन पदाची शपथ घेतो, तोच संविधानाची जाहीर अवहेलना करतो. राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय काहीच बोलत नाही, कारवाई करत नाही. अशा देशात त्यांच्या पक्षांचे कार्यकर्ते उन्मत होणार नाही? त्यांच्या 'आका'चे राज्य त्यांना काहीही करण्याची मुभा देतो. देशात कधी नव्हे असं सामाजिक स्वास्थ खराब झालं. शेतकरी, कष्टकरी फक्त जगत आहेत. राष्ट्रीय धोरणे आर्थिक मंदीकडे वाटचाल करत आहेत. राज्याचा जीव अदानी नावाच्या पोपटात अडकला असल्यामुळे अमेरिकेचा ट्रम्प दादागिरी करून देशाला गुढग्यावर आणत आहेत. अमेरिकेच्या हिताचे आर्थिक निर्णय धडाधड घेतल्या जात आहेत. अदानीसह इतर सहा लोकांना अमेरिकेच्या रेड कॉर्नर नोटीस पासून वाचवायला 'राजा' काहीही करायला तयार झाला. अश्या परिस्थितीत फक्त राजकारण करणारे अजून काय करतील? हे राष्ट्र आता भांडवलशाहीच्या विळख्यात संपूर्ण फसलं आहे. यातून सुटका नाही. मरणार, भोगणार ती फक्त गरीब जनता आणि भुकेली जनता. फुकट धान्य मिळते म्हणून ते कधीच पेटून उठणार नाही. पेटून उठली तरी पोटात दोन घास जर गेले नाही तर ते तरी काय करणार? त्यामुळे हा देश आता भांडवलदारांच्या गुलामीतच राहणार आहे, हे स्पष्ट झालयं!

# बिहारमध्ये ड्युटीवर नो मेकअप!



सरकार केंद्राचे असो की राज्याचे, कधी कोणता कसा निर्णय घेईल? याचा नेम नाही. विशेषतः निवडणुका आल्या की सरकारे लोकहिताचे निर्णय घेवून सर्वसामान्य लोकांना खुश करण्याचा प्रयत्न करतात. निवडणूक आटोपली की पुन्हा पाठ फिरविली जाते.

सरकारने घेतलेल्या काही निर्णयाचा एका वर्गाला लाभ होतो तर काही वर्ग नाखुश असतात. काही वर्षापूर्वी बिहार सरकारने त्यांच्या राज्यात दारूबंदीचा निर्णय घेतला . याचे महिला वर्गाने स्वागत केले खरे. परंतु, वास्तविकता अशी आहे की याच बिहार राज्यात दारूची मोठ्या प्रमाणात तस्करी होते आणि नकली दारू विकली जाते. त्याच बिहार सरकारने आता नवीनच निर्णय घेतला आहे.

बिहार पोलिस मुख्यालयाने अलीकडेच महिला पोलिस कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना ड्युटीवर मेकअप न करण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. यावर एका अधिकाऱ्याने अलीकडेच सांगितले की, पोलिस दलात कडक शिस्त निर्माण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

या नवीन नियमानुसार, ड्युटीवर रील बनवणे, सोशल मीडियावर शस्त्रे दाखवणे किंवा खाजगी संभाषणासाठी ब्लूटूथ वापरणे देखील प्रतिबंधित आहे. हे निर्देश पुरुष पोलिसांना देखील लागू होतील, ज्यांना गणवेश योग्यरित्या परिधान करण्यास सांगितले आहे.

सर्व वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. बिहार पोलिसांनी महिला कर्मचाऱ्यांसाठी मेकअप आणि दागिन्यांवर स्पष्टपणे बंदी घालण्याची ही पहिलीच वेळ आहे. याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कठोर शिस्तीचा समजल्या जाणाऱ्या पोलीस दलात योग्यरित्या गणवेश परिधान करायलाच हवा. परंतु, ड्युटीवर मेकअप करून येण्यास मज्जाव? बात कुछ हजम नही होती भाया....

# हा कुठला न्याय?

शेतकरी हा राबराब राबतो, मेहनत करतो उन, पाऊस, वादळ, सुनामी, अवकाळी पाऊस यांच्याशी संघर्ष करतो तेव्हा त्यांच्या शेतातून धान्य पिकते व उत्पादन होते. परंतु आलेल्या पिकाला योग्य भाव मिळेल की नाही याचीही त्याला चिंता असते. आधीच तो कर्जामध्ये बुडाला असतो, परिवार चालविण्यास अडचण निर्माण होते अशा परिस्थितीत शेतकरी आत्महत्या करतांना दिसतात.

दुसरीकडे, राजकीय पुढारी मात्र पाच वर्षांत करोडपती होतात. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या खऱ्या वेदना राजकीय पुढारी समजूच शकत नाही. कारण राजकीय पुढाऱ्यांवर कधी आत्महत्येची पाळीच येत नाही.

शेतकरी आत्महत्या करणार नाही अशा योजना सरकारने अमलात आणायला पाहिजे. शेतकरी कष्ट करतो तरी पैशांनी शुन्य! राजकीय पुढारी समाजसेवा करतात म्हणे, मग हे कसे काय करोडपती? हा कोणता न्याय?

आज राज्यासह देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. कोणाजवळ बैलगाडी नाही, शेती करण्यास पैसा नाही. या उलट आपण विचार केला तर देशासह राज्यातील आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री यांच्या जवळ मोठ्या प्रमाणात शेती व चल-अचल संपत्ती दिसून येते आणि आज करोडपती आहेत. याला कोणते व कसले समाजसेवक म्हणावे? ही बाब देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला अजूनपर्यंत समजलीच नाही.

आज आमदार-खासदार-मंत्री करोडोंचे घोटाळे करतात व यांना सरकार आणि न्यायपालिकेकडुन क्लिनचीट मिळते व राज्याचे मंत्री म्हणून पुन्हा विराजमान होतात हे कोणते समाज सेवक म्हणावे?

आज राजकीय पुढारी सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यात धूळफेक करीत आहे व मेहनत न करता करोडोंची चल-अचल संपत्ती जमा करीत आहे. हे लोक एवढी संपत्ती जमा करून ठेवतात की सात पिढ्या बसुन खावू शकेल.

परंतु शेतकरी राबराब राबतो दिवसरात्र काबाडकष्ट करून १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरतो अशा अन्न दात्यावर आज आत्महत्येची पाळी येते ही कीती लाजिरवाणी गोष्ट म्हणावी? आज शेतकरी उपाशी आणि राजकीय पुढारी तुपाशी असल्याचे स्पष्ट दिसून येते.

आज भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही कृषिप्रधान देशातील शेतकरी गरीबीच्या खाईत गुदमरत आहे आणि जेव्हा गरीबी आपली सिमा रेषा ओलांडते तेव्हाच शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते. महाराष्ट्रासह देशातील कोणत्याही राज्य सरकारांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत ठोस असे कोणतेही पाऊल उचलले नाही.

जर उचलले असते तर शेतकऱ्यांवर आत्महत्ये वेळ कदापि आलीच नसती. परंतु आपल्या देशात उलट आहे जे मेहनत आणि काबाडकष्ट करतात तो शेतकरी दिवसेंदिवस गरीबीच्या खाईत दबत आहे व राजकीय पुढारी दिवसेंदिवस अती श्रीमंत होतांना दिसत आहे.

आज राजकीय पुढाऱ्यांजवळ येवढा पैसा आहे की देशाला तब्बल दहा वर्षे कोणाही जवळुन कर्ज घेण्याची गरज नाही.

राजकीय पुढारी समाज सेवा करतात असे म्हटल्या जाते मग समाजसेवा करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांजवळ एवढा पैसा येतो कोठून? यांच्यावर आत्महत्येची पाळी का येत नाही? यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढाऱ्यांना अमाप पगार आणि वाममार्गाने पैसा कमविण्याची योग्य सुविधा या सर्वच उपलब्ध असतात. यांचे पाप शेतकऱ्यांना भोगावे लागते व आत्महत्येची वेळ येते ही अत्यंत गंभीर बाब आहे, यावर सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

आज नंदुरबार सारखे अनेक जिल्हे राज्यात आहेत की त्या ठिकाणी सरकारकडून मुलभूत सुविधा अजून पर्यंत उपलब्ध नाहीत. तरीही सरकार फक्त घोषणांचा पाऊस पाडते व बघ्याची भूमिका घेतांना दिसते.


राज्यात किंवा देशात कोणतीही सरकार असो ते सर्व एकाच माळेचे मणी असतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विचार केला तर २००४ ते २०१३ या १० वर्षात ३६८४८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तर २०१४ ते २०२४ या ११ वर्षाच्या कालावधीत ४०९८२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या यावरून आपण समजू शकतो की शेतकऱ्यांची किती भयावह स्थिती आहे.

शेतकऱ्यांच्या गंभीर व बिकट परिस्थितीमुळे त्यांच्या आत्महत्या थांबता-थांबेना. परंतू राजकीय पुढारी मात्र समाजसेवेच्या नावावर मस्त मजा करतांना दिसतात, त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येतच नाही. हे सर्वच शेतकऱ्यांचे रक्त पितांना दिसतात.

ज्याप्रमाणे देशात व राज्यात राजकीय पुढाऱ्यांचे कमाईचे साधन आहे तसे साधण शेतकऱ्यांजवळ नसल्याने त्यांच्यावर आत्महत्येची पाळी येते. त्यामुळे हे मायबाप सरकार राजकीय पुढारी कधीच आत्महत्या करीत नाही. पण, शेतकरी आत्महत्या करणार नाही अशी काही तरी योजना सरकारने ताबडतोब अंमलात आणावी याचे राज्याच्या जनतेसह देशाची जनता स्वागतच करेल.

शेतकरी हा मनाने एवढा श्रीमंत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. परंतु पैशाने मात्र शुन्य आहे ही मोठी तफावत शेतकरी आणि राजकीय पुढारी यांच्यात दिसून येते. राजकीय पुढारी समाजसेवेच्या नावाखाली करोडो रुपये कमवितात व शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतात.

यावर महामहीम राष्ट्रपती, प्रधानमंत्री, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, कृषीमंत्री, केंद्र सरकार व संपूर्ण राज्य सरकारांनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे. कारण शेतकरी जगला तरच आपण जगू. त्यामुळे शेतकऱ्यांना सवोतीपरी मदत करणे काळाची गरज आहे. जय जवान जय किसान... जय हिंद....



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

वाचक लिहितात

### सर्वांनी अनुकरण करावे

दिनांक १७ जुलै रोजी उत्तराखंड सरकारने एक महत्त्वपूर्ण आदेश प्रसारित केला आहे. राज्यातील सर्व शासकीय शाळांमध्ये सकाळच्या प्रार्थनेच्या वेळेस भगवद्गीतेमधील एका श्लोकाचे पठण करून त्याचा अर्थ सांगण्याचा निर्णय घेतला आहे. या आदेशानुसार शिक्षकांनी केवळ श्लोक पठण न करता त्याचा

सखोल अर्थ, वैज्ञानिक संदर्भ तसेच त्यातून मिळणारे नैतिक मूल्य समजावून सांगणे आवश्यक आहे. दर आठवड्याला एक श्लोक त्या सप्ताहाचा श्लोक म्हणून निवडला जाईल. तो श्लोक शाळेच्या सूचना फलकावर लिहिण्यात येईल आणि आठवड्याच्या अखेरीस त्या श्लोकाचा विद्यार्थ्यांच्या मनावर काय सकारात्मक परिणाम झाला? यावर चर्चा होऊन त्याचा अभिप्राय घेतला जाईल.

या निर्णयावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले की, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्यनिष्ठा, नेतृत्वगुण तसेच भावनिक संतुलन या गुणांचे संवर्धन होईल. भगवद्गीता हा एक पवित्र ग्रंथ आहे.

त्यामध्ये भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेल्या अमूल्य अशा ज्ञानाचा अंतर्भाव आहे. या ज्ञानाचा मनापासून अभ्यास केल्यास व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यात ते ज्ञान उपयोगी पडेल.

उत्तराखंड राज्यातील भाजप सरकारने घेतलेला हा निर्णय अभिनंदनास पात्र आहे. याचे अनुकरण देशातील प्रत्येक शासकीय आणि अशासकीय शाळांमध्ये झाल्यास विद्यार्थ्यांच्या आयुष्यामध्ये निश्चितच अमुलाग्र बदल होतील.

■ शंकर पवार

### शिवकालीन गडांवर उमटली जागतिक मोहर!

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाराष्ट्र आणि तमिळनाडू या राज्यांतील १२ गडांना ह्यजागतिक वारसा मानांकन (World Heritage Tag) मिळणे, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या गडांचे नाव घेताच त्यांनी केलेले पराक्रम डोळ्यांसमोर येतात आणि ऊर अभिमानाने भरून येतो.

गनिमी काव्याच्या साहाय्याने पाच पातशाह्यांचा पराभव करून हिंदवी स्वराज्य निर्माण करणे, हा पराक्रम जागतिक स्तरावर गणल्या गेलेल्या अनेक पराक्रमांमधील एक महान पराक्रम आहे.

म्हणूनच, छत्रपतींच्या गडांना युनेस्कोकडून मिळालेले मानांकन हा केवळ त्या गडांचा नव्हे, तर हिंदवी स्वराज्याचा सन्मान आहे, असे म्हणणे योग्य ठरेल. या निमित्ताने एकच मागणी करावीशी वाटते, केवळ १२ गड नव्हे, तर छत्रपतींच्या प्रत्येक गडाला जागतिक वारसाचे मानांकन मिळायला हवे. तसेच गडांवर अन्य धर्मियांनी केलेली अतिक्रमणे तत्काळ दूर करून सर्व गड अतिक्रमणमुक्त करावेत. हीच खऱ्या अर्थाने छत्रपतींच्या गडांना दिलेली मानवंदना ठरेल.

■ सौ. प्रिया बागडदेव,छिंदवाडा



### किडनी स्टोनचा खूपच त्रास होतोय? प्या भरपूर पाणी

शरीराच्या महत्वाच्या अवयवांपैकी एक म्हणून किडनी ओळखली जाते. शरीरात साचलेली घाण याच किडनीच्या मदतीने बाहेर पडत असते. त्यामुळे जर तुम्ही किडनी निरोगी ठेवली तर तुमचं आरोग्य उत्तम राहतं. शरीर सुदृढ ठेवण्यासाठी प्रत्येक अवयवाचे कार्य योग्य प्रकारे होणे अत्यंत आवश्यक आहे.

किडनी रक्त फिल्टर करण्याचे काम करते. त्यामुळे किडनी निरोगी ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. पाण्याच्या मदतीने किडनीचे कार्य सुधारते आणि शरीरात साचलेली विषारी द्रव्ये बाहेर काढली जातात. आपल्या अवयवांचे कार्य योग्यरित्या चालण्यासाठी अन्न आणि पाणीदेखील आवश्यक आहे. विशेषतः मूत्रपिंडाचे कार्य सुधारण्यासाठी योग्य प्रमाणात पाण्याची गरज असते.


किडनीच्या आरोग्यासाठी पुरेसे पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे. पाणी किडनीचे कार्य सुधारते आणि शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत करते.

शरीरातील प्रत्येक अवयवाचे कार्य सुरळीत ठेवण्यासाठी योग्य आहार आणि पाण्याची गरज असते. विशेषतः मूत्रपिंडाच्या (किडनी) आरोग्यासाठी पाण्याचे प्रमाण महत्त्वाचे आहे, कारण ते निर्जलीकरण (डिहायड्रेशन) टाळते आणि मूत्रपिंडाशी संबंधित अनेक आजारांचा धोका कमी करते.

किडनीला कार्यक्षमतेने काम करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. शरीरात पाण्याची कमतरता झाल्यास, डिहायड्रेशनमुळे किडनीवर थेट परिणाम होतो. यामुळे शरीरात हानिकारक कचरा साचतो, ज्यामुळे किडनीचे नुकसान होऊ शकते. अपुरे पाणी पिण्यामुळे किडनी स्टोन, युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन (वळक) आणि किडनी निकामी होण्याचा धोका वाढतो.

निरोगी व्यक्तीने दिवसाला साधारण ३-४ लिटर किंवा ८-१० ग्लास पाणी प्यावे. मात्र, हे प्रमाण वय, कामाचे स्वरूप, हवामान आणि शारीरिक गरजांनुसार बदलू शकते. योग्य प्रमाणात पाणी पिणे किडनीच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ज्यांना मूत्रपिंडाशी संबंधित आजार आहेत, त्यांनी पाण्याचे सेवन डॉक्टरांच्या सल्ल्याने ठरवावे. किडनी निकामी झालेल्या किंवा डायलिसिसवर असलेल्या रुग्णांनी कमी पाणी प्यावे . कारण जास्त पाण्यामुळे किडनीवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो.

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### रक्षकच भक्षक ?

शनिदेवा तुमचा शिंगणापूरी
अगाध आहे महीमा
घरांना कुलूप नसूनही कुणाची
चोरी करण्याची हिम्मत होईना..

तुमच्याच सेवकांनी तुमचा
केसाने कापला गळा
हे पाहुन भक्तगण
अश्रू ढाळती ढळाढळा ..

गुरुंनाही दावला चमत्कार
आता रक्षकच बनले गद्दार
यांचा कसा घेता समाचार
हे नवा इतिहास घडविणार ..

# चिखलदरा तालुक्यात युरियाची कृत्रिम टंचाई

## शेतकऱ्यांना दुप्पट दराने खते विक्रीचा प्रकार सुरू




“चिखलदरा तालुक्यात 18 कृषी केंद्र असुन त्यातली 15 कृषी केंद्र सुरु आहे. बफर स्टाक मधिल 50 टन युरिया चिखलदरा तालुक्यात आला आहे. त्यात शेतकऱ्यांना युरिया भेटला पाहिजे या दिशेने प्रयत्न सुरु आहे.

**किरण मुळे, कृषी अधिकारी**

“शेतकऱ्यांना युरिया साठी भटकंती करावी लागत आहे. लगतच्या मध्यप्रदेशातुन 450 ते 500 प्रमाणे युरिया घेऊन येत आहे. कृषी विभाने युरिया उपलब्ध करुन द्यावा कृषी विभागावर शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे.

**नरेंद्र टाले, प्रहार कार्यकर्ता**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.18)** - चिखलदरा तालुक्यातील काटकुंभ, चुरणी व परिसरात युरिया खताची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, शेतकरी प्रचंड हवालदिल झाले आहेत. मक्का, सोयाबीन, तूर यासह अन्य खरीप पिके सध्या वाढीच्या टप्प्यावर असताना युरिया वेळेवर उपलब्ध न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

दुप्पट दराने विक्री, पण पावती मूळ दराचीच!

सरकारने निश्चित केलेला युरियाचा दर प्रती 50 किलो गोणीसाठी 268 रुपये इतका आहे. मात्र प्रत्यक्षात काही खत विक्रेते हीच गोणी 400 ते 450 रुपये दराने विकत आहेत. विशेष म्हणजे, विक्रीची पावती मात्र 268 रुपयांच्या मूळ दराचीच दिली जात असल्याचा शेतकऱ्यांचा गंभीर आरोप आहे. ही सर्रास सुरू असलेली लूट शेतकरी गप्प राहून सहन करीत आहेत.

### ‘लिंकिंग’चा फज्जा फोडला

युरिया विकताना काही केंद्रचालक शेतकऱ्यांना इतर न खपणाऱ्या मिश्र खतांच्या गोण्या खरेदी करण्याची सक्ती करीत आहेत. या प्रकारामुळे शेतकऱ्यांना अनावश्यक खर्च करावा लागत आहे. कंपन्यांच्या दबावाखाली ‘लिंकिंग’सारख्या चुकीच्या पद्धतीने विक्री होत असल्याचे चित्र आहे.

### तालुक्यातील अनेक गावांना फटका

काटकुंभ, चुरणी, हतरू, रुईपठार, कारजंखेडा, भुत्रुम, डोमी, कुही, सीमोरी, भांडुम, सलिता, एकताई, बोरदा, टेंब्रु, राहू, जारिदा, भंडोरा, पलस्या अशा अनेक गावांमध्ये ही समस्या तीव्र असून, शेतकरी यावर ठोस उपाययोजनेची मागणी करत आहेत.

### प्रशासनाने घालावे लक्ष

या गंभीर परिस्थितीवर त्वरित कारवाई न झाल्यास पिकांचे उत्पादन घटण्याचा धोका आहे. युरिया वितरणात पारदर्शकता, दरांवर नियंत्रण आणि काळाबाजार रोखण्यासाठी कृषी विभाग व प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

### कृत्रिम टंचाई, काळाबाजार वाढतोय

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, काही खत विक्रेते व वितरक युरियाच्या गोण्यांवर नियंत्रण ठेवून कृत्रिम टंचाई निर्माण करत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना वेळेवर खते मिळत नाहीत आणि काळाबाजार फोफावत चालला आहे. युरिया मिळवण्यासाठी अनेकांना अनेक केंद्रांवर वाऱ्या कराव्या लागत आहेत.

# वारसाप्रमाणे फेरफारासाठी सुधाकर घोडकी यांची टेंभुरखेडा ग्रामपंचायतीत धाव

## ग्रामस्थांतून नाराजीचे सूर




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.18)**- टेंभुरखेडा येथील सुधाकर भीमराव घोडकी यांनी वडिलांच्या निधनानंतर वारसाप्रमाणे नामांतरण (नमुना 8-अ फेरफार) करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज सादर केला होता. मात्र, चार महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आज त्यांनी ग्रामपंचायतीत धाव घेऊन आपली कैफियत मांडली.

सुधाकर घोडकी यांनी आपल्या घराच्या 8-अ उताऱ्यावर नाव नोंदवण्यासाठी आवश्यक ती सर्व कागदपत्रे चार महिन्यांपूर्वीच सादर केली होती. मात्र, त्या अर्जाची दखल घेतली गेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही ‘नंतर या’ असे सांगण्यात येत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे. या प्रकाराबाबत घोडकी यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारही दाखल केली आहे. सर्व नियम पूर्ण करूनही माझ्या अर्जावर निर्णय होत नाही, त्यामुळे ग्रामपंचायतीकडून मुद्दाम चालढकल केली जात आहे, असा संशय वाटतो, असे ते म्हणाले. दरम्यान, गावातील नागरिकांमधून ही ग्राम पंचायतीच्या कामकाजावर नाराजीचा सूर उमटला आहे.

वारस फेरफार, प्रमाणपत्रे, उत्पन्न दाखले यासाठी गावकऱ्यांना महिनोन्महिने चकरा माराव्या लागतात. वेळेवर काम होत नाहीत आणि सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागतो. वरिष्ठ प्रशासनाने याकडे लक्ष घालावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामपंचायतीतील ढिसाळ कारभारामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण होत असून, प्रशासनाने यावर तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मानवी जाणिवा कायम ठेवून प्रशासकीय कामकाज करा- ॲड. धर्मपाल मेश्राम

## पारधी समाज बांधवांची विविध विषयावर निवेदने, मागण्या सादर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.18)** - अनुसूचित जाती जमातीमध्ये येणारा पारधी समाज मुख्य समाजाच्या प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी शासन विविध धोरणे राबवित आहेत.

या योजनांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी मानवी जाणीव जोपासून प्रशासकीय कामकाज करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची उपाध्यक्ष तथा सदस्य धर्मपाल मेश्राम यांनी आज येथे केले. दस्तूर नगर येथील प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती - उद्योजकता विकास प्रकल्प, विवेकानंद छात्रावास येथे पारधी विकास परिषदेला (विदर्भ प्रांत) मार्गदर्शन करताना आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य मेश्राम यावेळी बोलत होते. प्रज्ञा प्रबोधिनी अमरावती - उद्योजकता विकास प्रकल्पाचे अध्यक्ष अविनाश देशपांडे, प्रदीप वडनेरकर, आशिष कावरे, अमरसिंग भोसले, आदिवासी विभागाच्या उपायुक्त जागृती कुंभरे आदी यावेळी उपस्थित होत्या.

आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य मेश्राम म्हणाले की, अन्य समाजाच्या तुलनेत पारधी समाज काहीसा मागे राहिला आहे. या समाजाच्या उन्नतीसाठी सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. सर्व




समाज बांधवांपर्यंत विकास गंगा पोहोचल्यावर खऱ्या अर्थाने देशाची प्रगती होईल. अधिकाऱ्यांनी मानवी जाणिवा जोपासून कामकाज करावे. या समाजाची सद्यस्थिती समजून घेण्यासाठी मी राज्यभर पारधी समाजाच्या बेड्यांवर फिरलो. त्यांच्या गाऱ्हाणी, तक्रारी समजावून घेतल्या. कायद्याने ज्या तरतुदी आहेत, त्याचा योग्य उपयोग करुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे ते यावेळी म्हणाले. आदिवासी विभागाच्या उपायुक्त श्रीमती कुंभरे यांनी यावेळी पारधी समाज बांधवांसाठी आदिवासी विभागामार्फत राबण्यात येणाऱ्या विविध तरतुदींविषयी माहिती दिली. पारधी समाज बांधवांसाठी न्युक्लिअस बजेटमधून आर्थिक सहाय्य पुरविण्यात येते.

नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी व्यक्ती अथवा गटांना आर्थिक सहाकार्य करण्यात येते. घरकुलासाठीही सहकार्य करण्यात येते. स्वाभिमान सबळीकरण योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. आदिवासी बांधवांच्या विकासासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष योजनेअंतर्गत देखील मदत पुरविली जाते. पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे त्यांनी यावेळी सांगितले. पारधी समाज बांधवांनी विविध विषयावर निवेदने, मागण्या यावेळी सादर केल्या. त्यावर योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य मेश्राम यांनी यावेळी दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रशांत पवार यांनी तर रुपेश पवार यांनी आभार मानले.

# शेतीत उत्पादन वाढीसाठी मधमाशा पालनावर अनुदान

## खादी व ग्रामोद्योग विभागाचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)**- शेती पिके आणि फळबागांच्या उत्पादनात परागीभवनामुळे वाढ होते. यासाठी मधमाशापालन हा एक अत्यंत उपयुक्त शेतीपूरक व्यवसाय असून, याला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा खादी व ग्रामोद्योग विभाग 50 टक्के अनुदान देत आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाद्वारे ‘मधकेंद्र योजना’ संपूर्ण राज्यात राबविली जात आहे. या योजनेअंतर्गत मध उद्योगाचे मोफत प्रशिक्षण, साहित्याच्या स्वरूपात 50 टक्के अनुदान, 50 टक्के स्वगुंतवणूक, शासनाच्या हमीभावाने मध खरेदी तसेच विशेष छंद प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. या योजनेसाठी वैयक्तिक मधपाळ हा साक्षर असावा, वय 18 वर्षांपेक्षा जास्त असावे आणि स्वत:ची शेती असल्यास प्राधान्य राहील. केंद्रचालक (प्रगतिशील मधपाळ) हा किमान 10 वी पास, वय 21 वर्षांपेक्षा जास्त नसावे.

त्याच्या किंवा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावावर किमान 1 एकर शेती जमीन असावी किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली शेती चालेल. त्याला मधमाशापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता व सुविधा असावी. केंद्रचालक संस्था असल्यास ती नोंदणीकृत असावी. संस्थेच्या मालकीची किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली किमान हजार चौ. फूट सुयोग्य इमारत असावी. संस्थेकडे मधमाशापालन, प्रजनन व मध उत्पादनाबाबत लोकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता असावी. मध उद्योगाच्या प्रशिक्षणासाठी अर्ज महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत जिल्हा उद्योग केंद्र, कॅम्प, अमरावती येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी निरीक्षक मध पी. के. आसोलकर (मो. नं. 9421111665) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

# भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत भूजल दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.18)** - भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, अमरावती यांच्या वतीने नुकताच 54 वा वर्धापन दिन ‘भूजल दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. प्रादेशिक उपसंचालक डॉ. चंद्रकांत भोयर आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवताना डॉ. चंद्रकांत भोयर यांनी महाराष्ट्रातील जलसुरक्षेत यंत्रणेच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, भूजल पातळीचे अचूक सर्वेक्षण करून पाण्याचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे आणि जलसंधारणाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवणे हे संस्थेचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना आणि गावकऱ्यांना पाणी उपलब्धतेबाबत सातत्याने मार्गदर्शन करण्यात येत आहे. वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे यांनी भूगर्भातील पाणी पातळी टिकवण्यासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले. त्यांनी आवाहन केले की, वृक्षलागवड आणि पर्यावरण संवर्धन हे जलसंधारणाचे मूलभूत उपाय आहेत. वर्धापन दिनानिमित्त सामाजिक वनीकरण उपक्रमाअंतर्गत 50 झाडांची लागवड करण्यात आली. या झाडांमध्ये कडुनिंब, आवळा, पेरू, बकुळ, बेल आणि शमी यांचा समावेश होता. प्रत्येक अधिकाऱ्याने एक झाड दत्तक घेऊन त्याच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद झगेकर (माहिती शिक्षण संवाद तज्ज्ञ) यांनी केले, तर आभार प्रदर्शन वरिष्ठ लिपिक सचिन ठाकरे यांनी केले.

# चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत अनुज येवले घवघवीत यश



## महाविद्यालय कडून सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि.18)** - श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरूड येथील बी.कॉम. (इंग्रजी माध्यम) विभागातील 2022-23 चा माजी विद्यार्थी अनुज येवले याने चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) अंतिम परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण करत घवघवीत यश संपादन केले. या यशाकरिता अनुजचा महाविद्यालयाकरिता सत्कार करण्यात आला.

अनुज येवले हा वरुड तालुक्यातील शेंदूरजनाघाट येथील शिक्षक कॉलनी परिसरात राहणारा असून तो शेतकरी संजय रामकृष्ण येवले यांचा सुपुत्र आहे. आपल्या यशाचे श्रेय तो आपल्या शिक्षकांना आणि आई-वडिलांना देतो.

या विशेष यशाबद्दल महाविद्यालयात अनुज येवले याचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्राचार्य डॉ. डी. व्हि. हांडे यांच्या हस्ते अनुज याचा सत्कार करण्यात आला. त्यांनी अनुजचे अभिनंदन करत त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य हांडे यांनी सांगितले की, अनुजचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायक आहे. मेहनतीच्या जोरावर कोणतीही शिखरे गाठता येतात, हे अनुजने दाखवून दिले आहे. या कार्यक्रमाला वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. माधुरी उमेकर, माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव राजेश गणोरकर उपस्थित होते. अनुज याने प्रा. उमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बी.कॉम. शिक्षण पूर्ण केले होते.महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनीही अनुजच्या यशाचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# पंडित दीनदयाल महारोजगार मेळावा 22 जुलै ला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)**- जिल्ह्यातील तरुण-तरुणींसाठी महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय आणि सुशिला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट यांच्या संयुक्त विद्यमाने 22 जुलै 2025 रोजी सकाळी 11 वाजता श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे पंडित दीनदयाल महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात रेमंड लक्झरी कॉटन, दामोदर इंडस्ट्रीज, गुरुलक्ष्मी कोटेक्स, फ्लिपकार्ट, मुरली टोयोटा, बजाज ऑटो यांसारख्या अनेक नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र उमेदवारांना त्याच दिवशी नियुक्ती पत्रे दिली जातील. इच्छुक उमेदवारांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नि:शुल्क ऑनलाईन नोंदणी करावी, किंवा मेळाव्याच्या ठिकाणीही नोंदणीची सोय उपलब्ध असेल. जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त यांनी जास्तीत-जास्त युवकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आज दौरा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 18)**- पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उद्या शनिवार, दि. 19 जुलै रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार, पालकमंत्री बावनकुळे यांचे सकाळी नागपूरहून अमरावतीकडे प्रस्थान. सकाळी 12 वाजता सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे यश असोसिएटस् व आसरा रेस्टॉरंट तथा कैलास छाया गिरोळकर चैरिटेबल ट्रस्ट, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यस्तरीय तेली समाज गुणवंत विद्यार्थी सोहळा व तेली समाज उद्योजक मेळावा कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी 1.30 वाजता सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल येथे आरोग्य विभाग आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी 3 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवन येथे शंभर दिवस कृती आराखड्यातंर्गत विभागीय तसेच जिल्हास्तरीय प्रथम, व्दितीय व तृतीय आलेल्या कार्यालयांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी 3.30 वाजता येथे घरकुल लाभार्थी यांना रेती वाटप कार्यक्रम. जिल्हा नियोजन भवन येथेच दुपारी 4 वाजता महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा व



स्वच्छता विभागामार्फत अमरावती जिल्ह्यातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धेत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम तसेच दुपारी 4.30 वाजता अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना व्हॉट्स ?प चॅट बोथ व लोगो ऑफ अमृत अंबानगरी सेवांचे लोकार्पण सोहळा कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी 5 वाजता शासकीय विश्रामगृह येथे जनसंवाद कार्यक्रम.

# अमरावतीच्या औद्योगिक विकासासाठी धोरणात्मक पावलं आवश्यक - आ. संजय खोडके

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती/ मुंबई (दि.18)**- अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी योग्य धोरण आखण्याची नितांत गरज आहे, असे मत आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेत मांडले. अमरावतीमध्ये पाणी, वीज, रस्ते, मनुष्यबळ आणि गुंतवणूकदार उपलब्ध असूनही जिल्हा औद्योगिकदृष्ट्या मागे पडला आहे. त्यामुळे उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष सवलती व सुविधा देणे गरजेचे आहे.

खोडके यांनी राज्यातील इतर शहरांप्रमाणे अमरावतीतही स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, उद्योगांच्या क्लस्टर निर्माण केल्यास गुंतवणूक वाढेल आणि स्थानिक रोजगार उपलब्ध होईल.

अमरावतीमध्ये उभारण्यात आलेल्या मेगा टेक्स्टाईल पार्कमध्ये प्लॉटचे दर इतर राज्यांच्या तुलनेत जास्त



असल्यामुळे उद्योजक गुंतवणूक करत नाहीत. इतर टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच येथेही दर कमी करून, सवलती व सुविधा देण्यात आल्यास मोठ्या कंपन्या येथे येऊ शकतात. यासाठी वीज सवलत, पाणी आरक्षण आणि करसवलती दिल्या जाव्यात, असे खोडके म्हणाले. खोडके यांनी वर्क फ्रॉम टाऊन या उपक्रमाची अंमलबजावणी अमरावतीतील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये करावी, असे सुचवले. यामुळे आयटी कंपन्या स्थानिक पातळीवर काम करू शकतील व विद्यार्थ्यांना संधी मिळेल. शेवटी त्यांनी कोरडवाहू शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्यासाठी विशेष योजना आणण्याची गरज व्यक्त केली.उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उत्तरात सांगितले की, अमरावती टेक्स्टाईल पार्कच्या प्लॉटचे दर कमी करण्यात आले असून, सरकार लवकरच सकारात्मक निर्णय घेईल.

### रखडलेल्या प्रकल्पांवर चिंता

खोडकेंनी भारत डायनॅमिक्स प्रकल्प व रेमंड कंपनी बाबत चिंता व्यक्त केली. दोन्ही प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेले आहेत. भारत डायनॅमिक्स हा देशासाठी महत्त्वाचा प्रकल्प असून, तो सुरू झाल्यास अमरावतीत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. रेमंड कंपनीने घेतलेली जमीन अयोग्य वापरात आहे. जर करारात दिलेली अटी पाळल्या नाहीत, तर जमीन परत घेऊन नवीन उद्योगांना दिली जावी, अशी मागणीही त्यांनी केली.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे श्री. अजिंक्य महादेवराव तांबट आणि श्री. राहुल महादेवराव तांबट यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णन: मौजे पेठ अमरावती, सर्वे क्रं. 60/2 A (as per online 7/12 Survey no. 60/2A/1), प्लॉट क्रं. 7, सबडीवायडेड प्लॉट क्रं. 7/1 ता. आणि जिल्हा अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे श्री. अजिंक्य महादेवराव तांबट आणि श्री. राहुल महादेवराव तांबट हे, श्री. मनीष रमेश गिरी आणि सौ. स्मिता मनीष गिरी यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर, श्री. अजिंक्य महादेवराव तांबट आणि श्री. राहुल महादेवराव तांबट यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि.07/11/2002 रोजीचे दस्त क्र. 3737 हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/ राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती

कोर्ट शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती
मो. नं. 9823698745



# बालांगण



# मस्त मॅसेडोनिया

**सफर देशांची**

मॅसेडोनिया हा दक्षिणपूर्व युरोपमधला देश आहे. एके काळी इथे राजेशाही होती. मॅसेडोनियन साम्राज्य बऱ्याच मोठ्या भूभागावर पसरलं होतं. मात्र आता या देशाचा आकार बराच छोटा आहे. पर्वत, तलाव, झाडं आणि विविध प्रजातींचे प्राणी ही या देशाची ओळख बनली आहे. स्कॉप्जे ही मॅसेडोनियाची राजधानी. बल्गेरिया, ग्रीस, सर्बिया आणि अल्बानिया हे याचे शेजारी देश. मॅसेडोनिया हा चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला देश आहे. माउंट कोराब हे या देशातलं सर्वात उंच शिखर. या देशात मोठ्या टेकड्या, खोल दऱ्या आणि त्याच्या सभोवताली पर्वतरांगा असं निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. देशात पाण्याचे ११०० पेक्षा जास्त स्रोत आहेत. यात ओहरिड, प्रेस्पा, डोइरॅन अशा तलावांचा समावेश आहे. ब्रॅगॅल्निका, सिरना आणि वरदार या इथल्या प्रमुख नद्या आहेत. वरदार नदी या देशाच्या मधून वाहत ग्रीसपर्यंत जाते.

मॅसेडोनियातलं तापमान सौम्य स्वरुपाचं असतं. इथे विविध प्रजातींचे प्राणी आणि झाडंझुडपं पहायला मिळतात. या देशात तीन राष्ट्रीय उद्यानं आणि संरक्षित प्रकल्प आहेत. अस्वलं, हरणं आणि लांडगे देशाच्या डोंगराळ भागात फिरताना दिसतात. या देशात झाडांच्या ३५०० पेक्षा अधिक प्रजाती पहायला मिळतात. या देशाला प्राचीन वारसा लाभला आहे. इसवीसनपूर्व ८०८ मध्ये कॅरॅनसने मॅसेडोनियाचं साम्राज्य प्रस्थापित केलं आणि संपूर्ण युरोपभर पसरवलं. दुसऱ्या फिलिपने मॅसेडोनियाच्या सर्व शेजाऱ्यांचा पराभव केला. अलेक्झांडर द ग्रेट हा फिलिपचा मुलगा. त्याने संपूर्ण जगावर राज्य केलं. मात्र त्याच्या मृत्यूनंतर या साम्राज्याची वाताहत झाली. विविध युरोपियन देशांनी या देशावर राज्य केलं. १९९१ मध्ये या देशाला युगोस्लाव्हियाकडून स्वातंत्र्य मिळालं.

# मनोरंजक बीच क्रिकेट

**फन टाईम**

छोट्या दोस्तांनो, तुम्ही बीचवर गेल्यावर क्रिकेट खेळत असाल. वाळूमध्ये क्रिकेट खेळण्याची मजा काही वेगळीच असते. तुम्ही गंमत म्हणून बीच क्रिकेट खेळता. पण इंग्लंडमध्ये बीच क्रिकेटची स्पर्धा रंगते. या स्पर्धेचे नियम सहभागी होणारे संघ ठरवतात.

दर वर्षी इथे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. मे ते सप्टेंबर या काळात बीच क्रिकेट स्पर्धा रंगते. शीप इन क्लबतर्फे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. ब्रिटनमध्ये या एकाच क्लबकडे बीच क्रिकेटचं पीच आहे. हे पीच समुद्राच्या लाटेत वाहून जातं. मग दोन ते तीन दिवसांनी रोलर फिरवून नवं पीच तयार करावं लागतं. वेस्ट इंडिजमध्ये समुद्रकिनारे असल्यामुळे बीच क्रिकेट खेळलं जातं. तिथूनच ही संकल्पना ब्रिटनमध्ये पोहोचली. बीच क्रिकेट स्पर्धेचे नियम गल्ली क्रिकेटसारखेच असतात. या स्पर्धेत वाईड आणि नो बॉल दिला जात नाही. ही स्पर्धा मनोरंजनासाठी भरवली जात असल्याने कोणीही यात सहभागी होऊ शकतो. इथे खेळाडूंना स्वतःच धावसंख्या लक्षात ठेवायची असते. प्रत्येक बॉलनंतर ओरडून स्कोअर सांगावा लागतो. बरेचदा फलंदाजालाच लांब गेलेला बॉल घेऊन यावा लागतो. फिल्डरने एका हाताने झेल घेतला तर फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव संपतो. विकेट्स आणि ओव्हर उरल्या असल्या तरी त्यांना डाव संपवावा लागतो. तर अशी ही भन्नाट बीच क्रिकेट स्पर्धा खेळावीशी वाटतेय ना?



# कार्टूनचे पपेट्स

**करून तर बघा**

मुलांनो, तुम्हाला पपेट्स माहीत आहेत ना? पपेट्स म्हणजेच बोलक्या बाहुल्या. विविध आकारांचे पपेट्स बोटात घालून त्यांचा आवाज काढून खेळायला खूपच गंमत वाटते. असे पपेट्स तुम्ही बनवू शकता. तुमच्या आवडत्या प्राण्यांचे, कार्टून्सचे पपेट्स बनवून मित्रमंडळींसोबत तुम्ही छान छान खेळही खेळू शकता.

**साहित्य :** आईस्क्रिमच्या काड्या, सुती किंवा लोकरी कापड, डोळे आणि गम.


**कृती :** * सर्वात आधी सुती किंवा लोकरी कापडापासून विविध आकार कापून घ्या. तुम्हाला प्राण्यांच्या शरीराचे दोन एकसारखे आकार लागतील. यासोबतच कान, नाक आणि इतर अवयवांचे हवे तसे आकार कापून घ्या. * प्राण्यांच्या शरीरावर तुम्ही कान चिकटवून घ्या. मग कापडाच्या उलट्या बाजूला कडेने गम लावून घ्या. त्यानंतर काडीला गम लावून ती मध्यभागी चिकटवा. * त्यानंतर दोन सारख्या आकारांपैकी दुसरा आकार कडेला गम लावलेल्या भागावर नीट दाबून चिकटवा. * मग डोळे, नाक, हात, पाय तसंच अन्य काही अवयव असतील तर ते चिकटवून घ्या. उंदीर, मांजर, वाघ अशा प्राण्यांना तुम्ही मिशा चिकटवू शकता. यासाठी काळा दोरा किंवा वेल्वेट पेपरचा वापर करता येईल. * अशा प्रकारे कल्पनाशक्ती लढवून तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी, पक्षी तयार करू शकता. * हे पपेट्स तयार केल्यानंतर तुम्ही प्राण्यापक्ष्यांचे आवाज काढून पपेट शो सादर करू शकता.



# संधी कॉम्प्युटर इंजिनिअरिंगनंतरच्या

**कोण होणार?**

कॉम्प्युटर इंजिनिअरिंगला इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्सचं मिश्रण मानलं जातं. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि ॲप्लिकेशन्सकडे लोकांचा कल वाढत चालल्याने कॉम्प्युटर इंजिनिअर्ससाठी बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. खासगी क्षेत्रासोबतच सरकारी क्षेत्रातही आता कॉम्प्युटर इंजिनिअर्सना नोकऱ्या मिळतात. इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे उपविभाग असणाऱ्या सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवर्किंग, डेटाबेस, कम्युनिकेशन याबाबतची धोरणं आखण्यासोबतच नव्या योजना तयार करण्यासाठी या तज्ज्ञांची गरज लागते. देशात माहिती तंत्रज्ञानाचं क्षेत्र विस्तारण्याच्या कामात या कॉम्प्युटर इंजिनिअर्सची मदत होते. ही पदवी मिळवल्यानंतर तुम्ही सरकारी नोकरी मिळवू शकता. सिस्टिम इंजिनिअर, सॉफ्टवेअर डेव्हलपर, हार्डवेअर इंजिनिअर, सिस्टिम ॲनालिस्ट, नेटवर्किंग इंजिनिअर, डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, कॉम्प्युटर प्रोग्रामर, सॉफ्टवेअर टेस्टर अशा विविध भूमिका या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना पार पाडाव्या लागतात. कॉम्प्युटर इंजिनिअरींगची पदवी घेतल्यानंतर तुम्ही सरकारी नोकऱ्यांसाठी अर्ज करू शकता. वरिष्ठ पदांसाठी अर्ज करताना मास्टर्स पदवीची गरज लागते. इस्रो, उच्च न्यायालय, एचआयएल, ईसीआयएल, एनटीआरओ अशा सरकारी संस्थांमध्ये तुम्ही नोकरीसाठी अर्ज करू शकता.



**दोस्त हे मस्त**

## कासवांच्या जगात



मुलांनो, आज आपण कासवाविषयी माहिती घेऊ. कासवाच्या पाठीवरचं कवच खूप टणक असतं. त्यावर दगड मारला तरी कासवाला काहीच त्रास होत नाही. हे कवच त्यांच्या शरीराचा भाग असल्याने काढता येत नाही. कासवाच्या तोंडात दात नसतात. त्याऐवजी पातळ चकतीसारखं हाड असतं. त्याचा वापर ते खाण्यासाठी करतात. जमिनीवर रहाणारी आणि पाण्यातली अशी दोन प्रकारची कासवं असतात. जमिनीवरची बरीच कासवं शाकाहारी असतात तर पाण्यातली कासवं छोटे मासे किंवा पाण्यात रहाणारे छोटे जीव जंतू खातात.

**खादाडी**

## कॉलिफ्लॉवर पकोडे

छोट्या दोस्तांनो, तुम्ही फ्लॉवरचा वापर करून एक मस्त पदार्थ बनवू शकता. कॉलिफ्लॉवर पकोडे असं या पदार्थाचं नाव. यासाठी फ्लॉवरचे छोटे तुकडे घ्या. पाऊण वाटी मैदा घ्या. २ टेबलस्पून टॉमेटो सॉस, अर्धी वाटी ताक, दोन कप ब्रेडचा चुरा आणि मीठ असे पदार्थ जमवा.



एका मोठ्या भांड्यात ताक, मैदा, टोमॅटो सॉस आणि मीठ घाला. मिश्रण एकत्र करा. या मिश्रणात फ्लॉवरचे तुकडे घाला. ते ब्रेडच्या चुऱ्यात घोळा. कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे लालसर रंगावर तळून घ्या. कॉलिफ्लॉवरचा चटपटीत अवतार तयार आहे.

**घ्या काळजी**

## नेलपॉलिश लावताय?



मुली वरचेवर नेलपॉलिश लावतात. पण मुलींनो, तुमची नखं खूप नाजूक असतात. सतत नेलपॉलिश लावल्यामुळे नखं कोरडी होतात. पिवळी पडू लागतात. नेलपॉलिश मधल्या रासायनिक घटनांमुळे आपल्याला आजार होऊ शकतात. त्यामुळे एखादा कार्यक्रम असेल तेव्हाच नेलपॉलिश लावा. शक्यतो उजव्या हाताच्या नखांना नेलपॉलिश लाऊ नका. यामुळे तुमची नखं आणि आरोग्य दोन्ही चांगलं राहिल.


**योगा टाईम**

## असं आहे चक्रासन

मुलांनो, तुम्ही चक्रासन करू शकता. यासाठी जमिनीवर झोपा. दोन्ही पाय दुमडून घ्या. आता हातांचे दोन्ही पंजे खांद्याखाली ठेवा. दीर्घ श्वास घ्या. श्वास सोडताना शरीराचा कंबरेखालचा भाग वर उचला. पुन्हा श्वास घेऊन वरचा भागही वर उचला. ६० ते ९० सेकंद या स्थितीत रहा. मग श्वास सोडताना पहिल्यांदा कंबरेखालचा भाग जमिनीला टेकवा आणि वरचा भाग खाली आणा.




# पॅच बांधा, मस्त राहा



**व्हॉट्स न्यू?**

दोस्तांनो, उन्हाळ्यात खूप उकडतं आणि हिवाळ्यात आपण कुडकुडत असतो. घरात एसी किंवा हिटर असला तरी बाहेर पडल्यावर आपल्याला त्रास होतो. हीच अडचण दूर करण्याचा प्रयत्न अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांनी केला. कॅलिफोर्नियाच्या सॅन डिएगो विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी एक पॅच विकसित केला. हा पॅच शरीरावर बांधल्यानंतर बाहेरच्या तापमानानुसार आपलं शरीर थंड किंवा गरम रहातं. एखाद्या पट्ट्याप्रमाणे हा पॅच हातावर बांधता येतो आणि अगदी सहज कुठेही कॅरी करता येतो. तो मुलायम असल्यामुळे बराच काळ हातावर बांधून ठेवता येईल. यात वेगळ्या प्रकारची बॅटरी बसवण्यात आली आहे. पॅच ताणला गेला तरी ती खराब होत नाही. हा पॅच हातावर बांधला की तुम्हाला उन्हाळा किंवा थंडी जाणवणार नाही, असं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. यामुळे संपूर्ण शरीर थंड किंवा गरम राहू शकेल. तापमानात चढउतार अनुभवणाऱ्या भागांमधील लोकांना हा पॅच खूप उपयुक्त ठरू शकेल. त्यात थर्मो इलेक्ट्रिक मटेरियलचा वापर करण्यात आला आहे. हा शोध अनोखा म्हटला पाहिजे.


**ठिपके जुळवा**



# कॅलेंडर्सची धमाल दुनिया

**माहीत आहे?**

नववर्ष वाजत गाजत सुरू झालंय. तुमच्या घरातही भिंतीवर नवं कोरं कॅलेंडर दिमाखात लागलं असेल. तुम्हाला माहितेय, जगात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी नववर्ष साजरं होतं. अर्थातच त्यानुसार कॅलेंडर्सचेही वेगवेगळे प्रकार पहायला मिळतात. भारतातच जवळपास ५० प्रकारची कॅलेंडर्स पहायला मिळतात.





* ग्रेगोरियन कॅलेंडर – हे कॅलेंडर जगभर प्रसिद्ध आहे. पोप ग्रोगरी (१३वे) यांनी १५८२ मध्ये या कॅलेंडरची निर्मिती केली.





* भारतामध्ये विक्रम संवत, शक संवत, हिजरी संवत, फसली संवत, बांगला संवत, बौद्ध संवत, जैन संवत, खालसा संवत, तमिळ संवत, मल्याळम संवत, तेलगू संवत आदी प्रचलित आहेत.

* विक्रम संवत गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्यानं उज्जनीच्या शकांना पराजित केल्याच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू केलं. हे वर्ष चैत्र महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होतं.

* शक संवतला शालिवाहन शकही म्हणतात. शक सम्राट कनिष्क यानं इ.स. पूर्व ७८ मध्ये सुरू केलं.

* रोमन कॅलेंडर जगातील सर्वात पहिलं कॅलेंडर समजलं जातं. यानुसार मार्चमध्ये नववर्ष सुरू होतं.

* हिजरी कॅलेंडर हे इस्लाम मधील हिजरी वर्षाच्या नावानं सुरु झालेलं कॅलेंडर आहे. या कॅलेंडरनुसार नवीन वर्ष मोहरमच्या महिन्यापासून सुरू होतं.

* आपला शेजारी देश असणारा चीनमध्येही वेगवेगळी कॅलेंडर बघायला मिळतात.





## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) मेघालयची राजधानी कोणती?
२) फिरोजशाह कोटला मैदान कोणत्या शहरात आहे?
३) सीबीएसईचं पूर्णरुप काय?
४) साप वारंवार जीभ का बाहेर काढतो?
५) ऑलिम्पिकमधला कोणता खेळ दाढी ठेऊन खेळता येत नाही?
६) पृथ्वीला मिळणाऱ्या ऊर्जेचा प्रमुख स्रोत कोणता?
७) कॉम्प्युटरच्या की बोर्डच्या वरच्या पट्टीवर नसणारा एकमेव स्वर कोणता?
८) नाईल नदी कोणत्या देशात समुद्राला मिळते?
९) एका सहस्त्रकात किती वर्षं असतात?
१०) जपानमध्ये निवडणूक जिंकणारी भारतीय वंशाची पहिली व्यक्ती कोण?

# गरज रेनडिअर्स वाचवण्याची

**प्राणी जगत**

रेनडिअर या प्राण्याबद्दल तुम्ही ऐकलं असेलच. गायीसारख्या दिसणाऱ्या या प्राण्याला भलीमोठी शिंगं असतात. पण हा प्राणी हरणाच्या जातीचा आहे. तर जाणून घेऊया रेनडिअरबद्दल...

रेनडिअर उत्तर युरोप, उत्तर अमेरिका, आशिया आणि ग्रीनलॅण्ड या भागात आढळतात. या भागात बर्फ पडायला लागल्यानंतर रेनडिअर कळपा-कळपाने दक्षिणेकडे स्थलांतरित होतात. या भागात ते निवारा शोधतात. अन्न मिळवण्यासाठी शिंगाच्या सहाय्याने खोदकाम करतात. त्यांच्या शिंगात खूप शक्ती असते. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ खोदून ते आपलं अन्न शोधू शकतात.



रेनडिअर हिवाळयात दक्षिणेकडे जातात त्याचप्रमाणे उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे स्थलांतरित होतात. त्यांचं स्थलांतर पृथ्वीवरचं सर्वात मोठं स्थलांतर आहे. या काळात ते जवळपास ६०० मैल म्हणजेच ९६५ किलोमीटर अंतर पार करतात. टुंड्रा प्रदेशात मिळणारं गवत, मशरूम आणि वनस्पती हे त्यांचं उन्हाळ्यातलं अन्न असतं. रेनडिअर हिवाळ्यात दक्षिणेकडे स्थलांतरित होतात तर उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे येतात. वर्षभराच्या काळात ते तब्बल १६०० मैल म्हणजेच २,५७४ किलोमीटरचं अंतर पार करतात. एक प्रौढ रेनडिअर दिवसाला पाच किलो अन्न फस्त करतो.

रेनडिअरची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. त्यामुळेच वूडलॅण्ड रेनडिअरचा समावेश धोकादायक प्रजातींमध्ये झाला आहे. पण इतर रेनडिअरची संख्या मात्र स्थिर आहे. त्यामुळे वूडलॅण्ड रेनडिअरची शिकार थांबवण्याची गरज आहे. रेनडिअर साधारणपणे पंधरा वर्ष जगतात.

# वीज कोसळून दोन महिलांचा मृत्यू

## ५ महिला जखमी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १८ :

रामटेक तालुक्याच्या सोनेघाट येथे वीज कोसळून दोन महिलांचा मृत्यू झाला तर पाच महिला जखमी झाल्या.



रमेश जगन्नाथ राहते यांच्या सोनेघाट येथील शेतात ही घटना शुक्रवारी १८ जुलैला दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली आहे. शेतात २५ महिला काम करत होत्या. दुपारी या महिला जेवन करताना अचानक ढगांच्या गडगडाटासह वीज कोसळली.

या घटनेत मंगलाबाई जिवन मोटघरे (वय ४०), रा. गौरव नगर, परसोडा, ग्रामपंचायत शितलवाडी आणि वर्षा देवचंद हिंगे, (वय ३३), रा. भोजापूर ता. रामटेक या दोघींचा जागीच मृत्यू झाला. जयश्री आकाश जवादे (वय ३०), रंजू राजू अष्टेकर, (वय ३८), वनिता गजानन नागरीकर, (वय ५५) तिन्ही रा. रामेश्वर वॉर्ड, कलाबाई कवडू वरघणे, (वय ६०). प्रमिला वासुदेव आष्टनकर, (वय ४९), रा. भोजापुर, ता. रामटेक या ५ महिला जखमी झाल्यात. त्यांच्यावर उपचार उपजिल्हा रुग्णालय रामटेक येथे सुरू आहेत.

दरम्यान, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# स्मार्ट मीटरवरून वाढीव वीजबिलांच्या तक्रारीत वाढ

# महावितरणकडून तात्काळ दिलासा


■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

महावितरणच्या केळवद कार्यालयावर स्मार्ट मीटरमुळे वीजबिलांत वाढ झाल्याच्या तक्रारी घेऊन आलेल्या ग्राहकांना महावितरणने तात्काळ दिलासा दिला आहे. सर्व मोर्चेकरी ग्राहकांच्या मीटरवरील वीज वापराच्या नोंदी तपासून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

महावितरणच्या सावनेर विभागातील केळवद परिसरात महावितरणने सुमारे ४५० सदोष मीटर बदलून त्याऐवजी स्मार्ट मीटर लावले आहेत. हे मीटर बदलल्यानंतर काही ग्राहकांना अवास्तव वीजबिले आल्याच्या तक्रारी होत्या, ज्यामुळे त्यांनी महावितरण कार्यालयावर मोर्चा काढला होता.

यापैकी बहुतांश ग्राहकांना उन्हाळ्यातील सरासरी वीज वापराचे बिल मिळाले होते, कारण जुन्या मीटरचे रिडिंग घेतल्यानंतर नवीन मीटर बसवण्यात आले होते. यामुळे त्यांना वाढीव रकमेची बिले दिसली. केवळ दोन ग्राहकांनाच असामान्य बिले मिळाल्याचे निदर्शनास आले, जी तात्काळ दुरुस्त करून त्यांना देण्यात आली. असे महावितर्णतर्फे. स्पष्ट करण्यात आले.

मीटर बदलण्यात आलेल्या सर्वच ग्राहकांना वाढीव बिल आलेले नाही. काही मीटरचा डेटा महावितरणच्या बिलिंग सिस्टिममध्ये गेला नसल्यामुळे त्या ग्राहकांना सरासरी वीज वापराचे बिल मिळाले आहे. अशा सर्व ग्राहकांचे मीटर तपासणी करून त्यांना सुधारित बिले दिली जातील, असे आश्वासन महावितरणने मोर्चेकऱ्यांना दिले आहे. स्मार्ट मीटरमुळे अवाढव्य वीजबिल आले, असे म्हणणे चुकीचे असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.



सावनेर तालुक्यात आतापर्यंत जवळपास चार हजार स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. जिथे रीडिंग रिप्लेसमेंट डेटा सिस्टिममध्ये आला नाही, तिथे सरासरी वीज वापराची वाढीव बिले आली आहेत. ज्या ग्राहकांचे बिल वाढीव आलेले आहे, त्यांनी चिंता करण्याची गरज नाही. त्यांच्याकडील मीटरची तपासणी केल्यानंतर त्यांना सुधारित बिल देण्यात येईल. वाढीव बिलाची समस्या असल्यास, ग्राहकांनी तात्काळ महावितरणच्या उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महावितरणचे उपकार्यकारी अभियंता दिलीप राऊत यांनी मोर्चेकरी ग्राहकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या आणि त्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच, मीटर बदलताना वीज वापराच्या नोंदींचे वाचन करून गरज भासल्यास समांतर मीटर लावून नोंदी तपासण्याच्या सूचना दिलीप राऊत यांनी सर्व जनमित्रांना दिल्या आहेत.

# आवाज खाली... शहाणपणा नको!



## आमदार रोहित पवारांनी अधिकाऱ्यांना सुनावले खडेबोल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

शहाणपणा करू नका, बोलता येत नसेल तर बोलायचे नाही, अशा शब्दात कर्जत आमदार रोहित पवार यांनी पोलिस अधिकाऱ्यांना सुनावले आहे.

आवाज खाली, हातवारे करुन आमदारासोबत बोलायचे नाही, असा इशारा देखील रोहित पवार यांनी दिला. काल मध्यरात्री विधिमंडळात झालेल्या गोंधळ झाल्या नंतर आमदार रोहित पवार आणि आमदार जितेंद्र आव्हाड हे पोलिस ठाण्यामध्ये आपल्या कार्यकर्त्याची भेट घेण्यासाठी गेले होते. मात्र, तो कार्यकर्ता सदरील पोलिस ठाण्यामध्ये नसल्याचे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी रोहित पवार आणि पोलिसांमध्ये चांगली जुंपली होती. रोहित पवार यांनी पोलिस अधिकाऱ्यांना गंभीर इशारा दिला.

आमदार रोहित पवार यांचा पोलिसांना दमदाटी करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मध्यरात्री नंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर आव्हाड आणि रोहित पवार समर्थकांसह पोलिस ठाण्यात पोहोचले होते.

तिथे त्यांचा पोलिसांशी वाद झाला. त्या वेळेचा हा व्हिडिओ असल्याचे दिसून येत आहे. रोहित पवार यांनी संतप्त स्वरात थेट पोलिसांना दमदाटी केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. याबरोबरच त्यांचे कार्यकर्ते देखील यावेळी चांगलेच आक्रमक झालेले दिसून येते.

विधिमंडळाच्या लॉबीमध्ये दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारी नंतर पडळकरांच्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्याला मध्यरात्री नंतर ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर या कार्यकर्त्यांना पाहण्यासाठी आव्हाड आणि रोहित पवार थेट पोलिस ठाण्यामध्ये गेले. त्याच वेळेचा हा व्हिडिओ आहे.

# जन्मदात्यांवरच फावड्याने खूनी हल्ला

## आईचा मृत्यू, वडील गंभीर

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १८ :

गाडीची किस्त भरण्याकरिता पैसे का देत नाही, या कारणावरून वाद घालून एका तरुणाने फावड्याने आई वडीलांवर जीवघेना हल्ला केला. यात आईचा मृत्यू झाला तर वडील शेवटची घटका मोजत आहेत.



मृत पार्वती डेबूर | आरोपी जितेंद्र डेबूर

ही घटना बाभुळगाव तालुक्यातील यावली येथील कोलाम पोडावर घडली. जितेंद्र महादेवराव डेबूर (वय ४२) वर्ष रा. यावली असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीस तत्काळ ताब्यात घेतले आहे. पार्वती महादेव डेबूर (वय ६२) वर्ष असे मृतक आईचे तर महादेव उदयभान डेबूर (वय ६७) वर्ष असे गंभीर जखमी वडीलांचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनूसार, बाभुळगाव तालुक्यातील यावली येथे जितेंद्र व त्याची पत्नी सुशीला डेबूर आणि आई पार्वती व वडील महादेव डेबूर शेजारी शेजारी राहत होते. आईने जितेंद्र राहत असलेली जागा ही त्याच्या बहिणीच्या नावाने करून दिली होती.

या कारणावरून आई-वडिलांसोबत नेहमीच वाद होत होता. आरोपीची बहिण सुनंदा मेटकर हिने या प्रकरणी बाभुळगाव पोलिसात तक्रार दिली. त्यावरून आरोपी जितेंद्र डेबूर व पत्नी सुशीला डेबूर याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ठाणेदार एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनात बाभूळगाव पोलिस पुढील तपास करीत आहेत. सदर घटनेने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गाडीची शिल्लक हफ्ते भरण्यासाठी मागितले पैसे अश्यात १६ जुलैला रात्री ९ वाजताच्या दरम्यान जितेंद्र डेबूर हा घरी आला व बाजूला राहत असलेल्या आई-वडिलांसोबत गाडीची किस्त भरण्याकरिता पैसे देण्याचा तगादा लावला.

यावरून वाद झाला, अश्यातच जितेंद्र याने आईवडिलांच्या डोक्यावर लोखंडी फावड्याने वार केला. यात दोघांना जबर मार लागल्याने उपचारासाठी येथील शासकीय रूग्णालयात दाखल केले. परंतु आई पार्वती हिला डोक्याला मार असल्याने तिचा मृत्यू झाला.

# राज्याच्या विधिमंडळात गँगवॉर

## राष्ट्रपती राजवट लावा : खासदार संजय राऊत संतापले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रपती राजवटच लागायला पाहिजे, असे शिवसेनेचे स्पष्ट मत आहे. यांना महाराष्ट्र राज्य सांभाळता येत नाही. काल विधिमंडळात जे झाले, ते जर इतर कोणत्या राज्यात झाले असते किंवा दुसरा कोणी मुख्यमंत्री असता, तर हेच देवेंद्र फडणवीस विधानभवनाच्या पायऱ्यांवर येऊन किंचाळले असते. हे सरकार बरखास्त करुन येथे राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी त्यांनी केली असती, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.



देवेंद्र फडणवीस यांनी आत्मचिंतन केल्यानंतर माज्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली पाहिजे, हे त्यांना देखील कळेल, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. काल हाणामारी केलेल्यांना मी दोन आमदारांचे समर्थक म्हणणार नाही. समर्थक अशा प्रकारचा हल्ला करत नाही. भाजपच्या आमदार बरोबर जे त्यांचे लोक होते, त्यांचा रेकॉर्ड तपासा, असे आव्हान देखील राऊत यांनी दिले आहे.

### जितेंद्र आव्हाडांना मारण्याचा कट

राज्यपाल खरेच घटनेचे आणि संविधानाचे रखवालदार असतील तर त्यांनी कालच्या घटनेचा अहवाल गृह मंत्रालयाला पाठवून राष्ट्रपती राजवटीची शिफारस करायला हवी, अशी मागणी देखील राऊत यांनी केली. काल केवळ चाकू-सुरे असे हत्यारे बाहेर काढायचेच बाकी राहिले होते. त्यांच्या गाडीमध्ये अशा प्रकारचे हत्यारे होती, अशी माझ्याकडे माहिती आहे. जितेंद्र आव्हाड यांना मारण्याचा हा कट होता, अशी पक्की माहिती माज्याकडे असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केली आहे.

> अंडरवर्ल्ड प्रमाणेच भरती
> मकोकाचे आरोपी, दाऊदचे हस्तक, हे विधिमंडळात तुमच्या राज्यात यायला लागले आहेत. उद्या ते विधानसभेत देखील जातील. अशा प्रकारचा गँगवॉर हा सभागृहात देखील होईल. त्याला भारतीय जनता पक्षच उत्तेजन देईल, असा आरोप देखील राऊत यांनी केला. गेल्या दोन महिन्यात भाजपात ज्या लोकांची भरती झाली आहे, पूर्वी जशी अंडरवर्ल्ड मध्ये भरती व्हायची, त्या पद्धतीची ही भरती झाल्याचे राऊत म्हणाले.

संस्कृतीचे वस्त्रहरण संजय राऊत म्हणाले की, पांडव कमजोर होते म्हणून द्रौपदीचे वस्त्रहरण ते उघड्या डोळ्यांनी पाहत होते. तसेच वस्त्रहरण आज महाराष्ट्राच्या संस्कृतीचे होत आहे, असा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला आहे. भारतीय जनता पक्ष आणि त्यांचे नेते उघड्या डोळ्यांनी द्रौपदीचे वस्त्रहरण पाहत आहेत. त्याला सर्वस्वी जबाबदार देखील तेच आहेत. कारण ते जुगाराच्या अड्डयावर बसलेले आहेत. काल विधिमंडळात झालेले हे गँगवॉर आहे. मकोका, खून, दरोड्यातील आरोपी काल विधानभवनाच्या परिसरात कसे आले? त्यांना कोणी आणले होते? त्यांच्यावर काय कारवाई झाली? असे प्रश्न राऊत यांनी उपस्थित केले.

## काय अवस्था झाली महाराष्ट्राची? राज ठाकरेंचा सवाल



विधिमंडळामध्ये झालेल्या हाणामारीवरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. काय अवस्था झाली आपल्या महाराष्ट्राची? कोणाच्या हातात दिला आहे महाराष्ट्र? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. इतकेच नाही तर त्यांनी सरकारला गंभीर इशारा देखील दिला आहे.

या संदर्भात राज ठाकरे यांनी सोशल मीडियावरील पोस्टच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करत सत्ताधारी पक्षांवर टीका केली आहे. जर थोडी जरी साधनशुचिता शिल्लक असेल तर तुमच्या स्वतःच्या लोकांवर पण कारवाई करून दाखवा, असे आव्हान देखील त्यांनी सरकारला दिले आहे.

# : साप्ताहिक संवाद :

## लोकरंग

नुकतीच ठाणे जिल्ह्यातील शहापूरमधील शाळेतील मुलीबाबत जी दुर्दैवीघटना घडली ती फार धक्कादायक होती. एकीकडे मुंबईलगतच्या ठाणे जिल्हात ही घटना घडल्याचा धक्का आहेच, परंतु त्याहीपेक्षा जास्त, २०२५ या वर्षात इतक्या घातक मानसिकतेने मुलीच्या शरीराकडे पाहिले जातेय, हा मोठा धक्का. घडले काय होते, तर बामरूममध्ये रक्ताचे डाग दिसले. इतक्या साध्या गोष्टीचे अवडंबर माजवत, शाळेतील मुलींचे कपडे उतरवत तपासणी करणे, म्हणजे एकतर तुमच्या मनात मासिक पाळीबद्दल किती टोकाची नकारात्मक भावना आहे, हे तर दर्शवतेय, तर दुसरीकडे शाळेतील मुलींचे कपडे उतरवत तपासणी करण्याचा अधिकार हा शाळेला कसा काय मिळाला? याच अनुषंगाने मुलींच्या मासिक पाळीकडे बघण्याचा समाजाचा चुकीचा आणि बुरसटलेला दृष्टीकोन या संदर्भात स्त्रीरोगतज्ञ डॉ. ऐश्वर्या रेवडकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**मुलींच्या मासिक पाळी संदर्भातील सामाजिक मानसिकता नेमकी काय आहे?**

○ आजकाल सातत्याने बोलते जाते, की आता समाज पुढारला आहे, मासिक पाळीचा विटाळ वगैरे मानाला जात नाही. आणखी एक पातक समजूत म्हणजे 'ही मागास मनोवृत्ती फक्त ग्रामीण भागात, अडाणी लोकांत दिसून येते. शहरात असे काही आता शिलवक नाही. त्यामुळे मासिक पाळी संदर्भात जनजागृती जाऊन करावी अशा घातक समजुती कशा दूर कराव्यात, हे सर्वच सजग लोकांसमोर उभे राहिलेले मोठे प्रश्नचिन्ह आहे.

कारण एखादी समस्या आहे म्हणून स्वीकारली तर त्यावर उपाययोजना करता येते. संवाद साधून सामाजिक बदलाच्या दिशेने प्रयत्न करता येतात. परंतु, जर समस्याच नाकारली तर साध्या संवादाच्या शक्यताच नष्ट होतात. उच्चशिक्षित लोकांमध्ये आणखी एक नवीन फंडा पहायला मिळतो प्रत्येक गैरसमजाची कारण मीमांसा केली आहे, असे भासवत, त्याचे विपातक पैलू सरळ नाकारायचे, उदाहरणार्थ पाल्येच्या विटाळाबद्दल, स्त्रीला आराम मिळावा म्हणून तिच्या आरोग्याच्या दृष्टीने तिला बाजूला बसवले जाते,' असे म्हटले की सर्वांना ते कानाला गोड वाटून, आपोआप नकारात्मक बाजूकडे डोळेझाक केली जाते. परंतु, अर्थातच हे वास्तव नाही पाळीचा विटाळ हा कुठल्याही घरापर्यंत पोहोचून, स्त्रीसाठी विविध प्रकारे धोकादायक ठरू शकतो, हे आपण शहापूरच्या प्रकरणात पाहिलेच.

**○ ग्रामीण भागात विशेषत आदिवासी भागात याबद्दल काय रिथती आहे?**

आदिवासी भागात 'कुर्मा घर' ही पद्धत आहे. पाळी आली की आदिवासी स्त्रीला घराजवळच्या झोपडीत राहायला पाठवायचे. जनावरांच्या गोठ्यापेक्षाही वाईट असणाऱ्या या झोपड्या.

गडचिरोलीतील 'स्पर्श' या सामाजिक संस्थेने २०११ मध्ये २३३ कुर्मा घरांचे सर्वेक्षण केले तेव्हा लक्षात आले की स्त्रीला असे बाजूला केल्यामुळे, सर्पदंश, वन्य प्राण्यांचा हल्ला ते एखादा आजाराचे उपचार न मिळणे, असे प्रकार घडून २८ मुलीचा मृत्यू झाला होता. यात अर्थातच कुमारवयीन मुली, तरुणीचा समावेश होता.

पुढे आणखी व्यवस्थित, सखोल सर्वेक्षण आजही असंख्य मुली आणि स्त्रियांपर्यंत आरोग्यविषयक माहिती, सुधारणा, योजना पोहोचत नाहीत. त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत? आणि जो शहरी भागः जिथे इंटरनेटपासून स्विगीपर्यंत सारे काही पोहोचले आहे, तिथेही शहापूरसारखे प्रसंग घडतात तेव्हा दोष कोणाला द्यायचा?

**स्पर्श या सामाजिक संस्थेचे जनजागृती कार्य नेमके काय आहे?**

○ 'स्पर्श' ही संस्था आता आदिवासी स्त्रियांसोबत विविध प्रकारे काम करत आहे. तसेच 'समाजबंध' या संस्थेमार्फतही मासिक पाळीबद्दलच्या जनजागृतीचा भाग म्हणून, या कु प्रथेबद्दल आदिवासी भागात संवाद साधला जात आहे.

निदान अशा काही भागांत काही चांगल्या संस्था काम करत आहेत म्हणून एक सकारात्मक बदल घडताना दिसतो. परंतु, आणखी अशा असंख्य मुली, स्त्रीया आहेत, ज्यांच्यापर्यंत काहीही माहिती, सुधारणा, मोजना पोहचत नाहीत, त्यांच्यासाठी आपण काय करणार आहोत? आणि जो शहरी भाग, जिथे इंटरनेटपासून 'स्विगी ' पर्यंत सारे काही पोहोचले आहे, तिथेही शहापूरसारखे प्रसंग घडतात, तेव्हा दोष कोणाला द्यायचा?

जोपर्यंत समाज म्हणून आपण या साऱ्या हत्या प्रकाराची जबाबदारी घेत नाही तोपर्यंत सर्वांगीण बदल घडून येण्याची शक्यता खूप धूसर आहे. लिंगभाव, लिंगभेद हे मुळातून समजून घेणे आणि आपल्या रोजच्या वागण्यात बदत्त घडवून आणणे निकडीचे बनले आहे. प्रश्न फक्त मासिक पाळीतील विटाळाचा आणि मासिक पाळीवरलच्या गैरसमजाचा नाही तर स्त्रीच्या देहाकडे आपण स्वतः कसे पाहतो, आजूबाजूचा समाज कसा पाहतो, वेगवेगळ्या व्यवस्था कशा पाहतात हा आहे.

■ ■ ■



### ऐतिहासिक सेवाग्राम

महाराष्ट्रातील वर्धा जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा ठरतो तो वध्यार्तील सेवाग्राम मध्ये अनेक काळ असलेले महात्मा गांधींचे वास्तव्य.स्वधर्गीय जमनलाल बजाज यांच्या् विनंतीवरुन सन १९३६ साली महात्मां गांधी वध्यार्ला आले. त्यांनी आश्रम तत्कानलीन सेगावात करण्याचे निश्चित केले. सेवाग्राम आश्रमातूनच देशाची स्वा्तंत्र संग्राम चळवळ पूर्णअथार्ने सुरु होती. आजही गांधीजींचे उपयोगातील साहित्य सेवाग्राम येथील आश्रमात पाहावयास मिळते.

आश्रमाच्या परिसरातच आदी निवास, बापू कुटी, बाकुटी, आखरी निवास, महादेव कुटी, किशोर कुटी आदी ऐतिहासिक ठेवा जपण्यात आलेला आहे.या सर्वांची देखरेख आश्रम ट्रस्टि करत असते. सेवाग्राम आश्रमाच्या बाजूलाच गांधीजींच्याय जीवनावर आधारीत चित्रप्रदर्शनी आहे. तसेच भारत सरकारच्या पर्यटन आणि विकास खात्यांतर्गत पर्यटकांसाठी आश्रमाच्यार परिसरातच यात्रेकरूंसाठी निवासाची सोयही आहे. महात्मा गांधींच्या स्मरणार्थ सन १९४४ साली कस्तुवरबा रुग्णायलयाची स्थापनाही सेवाग्राम येथे करण्यात आलेली आहे.प्रत्येकाने पर्यटनासाठी एकदा तरी या ऐतिहासिक स्थळाला जरूर भेट द्यावी अस आवर्जून सांगावस वाटत.

■ ■ ■

## केल्टन टेक सोल्युशन्सची ९:५ स्टॉक स्प्लिटसाठी २५ जुलै तारीख निश्चित

KELLTON

फॉर्च्युन ५०० कंपन्यांना स्टार्टअप्सना सेवा देणाऱ्या डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनमध्ये जागतिक आघाडीवर असलेल्या केल्टन टेक सोल्युशन्स लिमिटेड (बीएसईः ५१९६०२, एनएसईः केल्टनटेक) ने जाहीर केले आहे की त्यांनी प्रत्येकी ५ रुपयांच्या प्रत्येक इक्विटी शेअरचे १:५ स्टॉक स्प्लिट (उपविभाग (विभाजन) आणि प्रत्येकी १ रुपयांच्या ५ इक्विटी शेअर्समध्ये) २५ जुलै ही तारीख निश्चित केली आहे.

अलीकडेच, बोडार्ने काही प्रमोटर आणि नॉन-प्रमोटर गुंतवणूकदारांना प्राधान्यक्रमानुसार ५५,००,००० पर्यंत वॉरंट जारी करून आणि वाटप करून निधी उभारण्याची घोषणा केली आहे, ज्याची कमाल रक्कम ६९.३० कोटी आहे. प्रमोटर, मॅटनिक फिनवेस्ट एलएलपी, ४५,००,००० पर्यंत वॉरंटची सदस्यता घेईल, ज्याची एकूण रक्कम रु. ५६.७० कोटी, नॉन-प्रमोटर ग्रुप करणजीत सिंग आणि श्रीनिवास पोतलुरी यांनी १०,००,००० पर्यंत वॉरंट सबस्क्राइब केले आहेत.

यापूर्वी, कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या चौथ्या तिमाही आणि वषासाठीचे आर्थिक निकाल जाहीर केले. २०२४-२०२५ या आर्थिक वषासाठी एकूण महसूल १०,९९९ दशलक्ष रुपये होता, जो वार्षिक आधारावर ११.७% ने वाढला. कंपनीने १,२९८ दशलक्ष रुपये EBITDA नोंदवला आणि मार्जिन ११.८% वर आला. निव्वळ नफा ७९८ दशलक्ष रुपये होता, जो वार्षिक आधारावर २४% वाढला आणि PAT मार्जिन ७.३% वर आला. समीक्षाधीन तिमाहीत एकूण महसूल २८७३ दशलक्ष रुपये होता; तिमाहीत २.९% वाढ आणि वार्षिक आधारावर १५.५% वाढ झाल्याचे दिसून येते.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# दिव्यांगांना मोठा दिलासा मासिक अनुदानात वाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

राज्यातील लाखो दिव्यांग बांधवांसाठी मोठी दिलासादायक घोषणा करण्यात आली आहे. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधान परिषदेत निवेदन करून दिव्यांगांच्या मासिक अनुदानात थेट १००० रूपयांची वाढ जाहीर केली.आता दिव्यांगांना दरमहा २५०० अनुदान मिळणार आहे.

आत्तापर्यंत दिव्यांगांना दरमहा १५०० अनुदान मिळत होते, मात्र महागाई आणि गरजा लक्षात घेता १००० ची वाढ करण्यात आली आहे.

हा वाढीव अनुदानाचा निर्णय संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रवण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना या योजनांच्या लाभार्थ्यांना लागू होणार आहे. मंत्री अतुल सावे म्हणाले, दिव्यांग बांधवांचे जीवन सुसह्य करण्यासाठी आणि त्यांना सक्षम करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे.

हा निधी सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा केला जाणार आहे. या निर्णयामुळे दिव्यांगांना महागाईच्या काळात आर्थिक आधार मिळणार असून, त्यांचे रोजचे जीवन अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

# जालना जिल्ह्यात मुसळधार

## शेती पिकाचे नुकसान

■ वृत्तसंस्था, जालना, दि. १८ :

एक महिन्याच्या विश्रांतीनंतर पाऊस पुन्हा सक्रिय झाला असून जालना जिल्ह्यात पावसाने जोरदार पुनरागमन केले आहे. गुरुवारी संपूर्ण जिल्ह्यात मुसळधार पाऊस झाला.

या पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घनसावंगी, परतूर या परिसरातील शेतांमध्ये पाणी घुसल्याने शेतात तलावाचे स्वरूप आले आहे. काही ठिकाणी पुरेशा प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकरी सुखावले आहेत.

काही ठिकाणी शेतात पाणी घुसल्याने शेतातील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी जोर धरत आहे.

दुसरीकडे, मुंबईसह राज्याच्या अनेक भागात आता पावसाने जोर धरला असून, मराठवाडा, कोंकण, पश्चिम महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे शेतीपिकाचे नुकसान झाल्याची माहिती पुढे येत आहे.

# जिल्ह्यातील शाळा सीसीटीव्ही विनाच

## विद्यार्थीनींची सुरक्षा वाऱ्यावर

■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज, दि. १८ :

गतवर्षी बदलापूर येथे शाळेत शिकत असणाऱ्या अल्पवयीन विद्याथीर्नी वरील अत्याचारानंतर शासनाने राज्यातील सर्वच शाळांना तात्काळ सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश दिले होते.



यासाठी शाळेतील राखीव निधी खर्च करण्याची परवानगी दिली होती मात्र बहुतेक शाळांनी हा विषय गांभीर्याने घेतला नसल्याने गडचिरोली जिल्ह्यातील विद्याथीर्नींची सुरक्षा वाऱ्यावर असून जनप्रतिनिधीसह शिक्षण विभाग व शाळांची उदासीनता यासाठी कारणीभूत असल्याची गंभीर तेवढीच खळबळजनक बाब समोर आल्याने शिक्षण विभागाप्रती पालकांनी कमालीची नाराजी व्यक्त केली आहे.

शाळांचे प्रवेशद्वार, शाळेत असलेला मोकळा भाग, ज्या ठिकाणी मोजकेच विद्यार्थी असतात असे ठिकाण, प्रसाधन ग्रहाच्या बाहेर, दोन ते तीन मजल्याची शाळा असेल तर जिन्यावर, खेळाच्या मैदानात तसेच ज्या ठिकाणी सभागृह आहे, तेथे सीसीटीव्ही क्यामेरे असतील तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह अनपेक्षित घटना टाळता येतील. अनेक शाळांच्या मागील बाजूलाही मोकळी जागा असते तेथेही सीसीटीव्ही क्यामेरे असले तर हा भागही निगराणीत येईल. असे असतानाही जिल्ह्यातील अनेक खासगी शाळा विषेशतः ग्रामीण भागातील शाळांमध्ये अजूनही सीसीटीव्ही बसविण्याबाबत उदासीनता दिसून येत आहे. शिक्षणाधिकारी कार्यालयाने सीसीटीव्ही क्यामेरे बसवावे असे पत्र सर्व शाळांना दिले होते मात्र त्याचा अद्याप कोणताही परिणाम झाला नसल्याने पुन्हा नव्या सत्रात शिक्षणाधिकारी कार्यालयाने पत्र देण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

ज्या शासकीय, खाजगी, अनुदानित, विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविण्याबाबत गंभीर नसतील अशा शाळांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी. एखादे वेळी अनुचित घटना घडली तर त्यासाठी जबाबदार कोण, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड व्हायला नको असे मत सुज्ञ पालकांनी व्यक्त केले आहे.